
२७ एप्रिल ६८ । ४० पैसे

# माणूस

संचलन कुठवर आले, कार्यक्रम कसे होतात, मराठवाड्यात जशी लोकांनी साथ दिली, तशी इतरत्र मिळते की नाही, सरकारवर याचा काही परिणाम होणार आहे का, संचलनानंतरचा कार्यक्रम काय, अशा अनेक शंका, प्रश्न आम्हाला विचारले जात आणि आम्हीही...............................



समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : अठ्ठेचाळिसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

| | |
|---|---|
| प्रा. गो. व्यं. देगलूरकर, | औरंगाबाद |
| डॉ. गोविंद खरे, | उस्मानाबाद |
| श्री. आ. ना. नारळकर, | पुणे |
| डॉ. भय्यासाहेब अकोलकर, | वांबोरी |
| श्री. गोपालजी ठक्कर, | शहापूर |
| श्री. ह. त्र्यं. देसाई, | बडोदे |
| श्री. अशोक भांगरे, | वाभळेश्वर (नगर) |
| श्री. भास्कर आर्वीकर, | बिडकीन |
| श्री. श्यामराव पाटील, | बालानगर |
| श्री. शं. ग. बाहेकर, | नागपूर |
| श्री. प्र. य. टिकेकर, | मुंबई |
| डॉ. गंगाधर धर्माजी पाटील, | मुंबई |
| श्री. प्र. न. अत्रे | कल्याण |
| श्री. अंबादास खोंडे | सुरंगली (सिल्ह ड) |

अन्न स्वतंत्रता संचलनाची यशस्वी सांगता झाल्या-बद्दल या मित्रांनी आणि 'माणूस'च्या वाचकांनी अभि-नंदनपर पत्रे पाठविली आहेत.

या सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

इच्छा असूनही स्थलाभावास्तव इतर काही जणांचा नामोल्लेख येथे करता आला नाही. क्षमस्व

श्री. ग. माजगावकर

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण,
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# प्रतिपच्चंद्ररेखेव

एखादी मैफल रंगावी तशी वेल्होळीची सभा रंगली. कुठल्याही, कुणाच्याही अभिप्रायाची अशा वेळी गरज नसते. आपले आपल्यालाच कळत असते, जाणवत असते की आज जम बसतो आहे, मेळ साधतो आहे, रंग भरतो आहे.

तरी पण 'आज सभा छानच झाली', असे सभा संपल्यावर मोकाशी म्हणाले तेव्हा सर्वांनाच समाधानाच्या दुधात साखर पडल्यासारखे वाटले. कारण, आजवर पाच–पन्नास सभा मोकाशींनी ऐकलेल्या होत्या. रोज तेच तेच विचार ऐकण्याचा त्यांनाही कंटाळा येणे स्वाभाविक होते. आम्हांलाही कधी कधी येतच होता—नवीन असे सांगितले जाण्याची शक्यता कमी होती.

पण त्या दिवशी सुरुवातच नव्या पट्टीत, नव्या लकेरीने झाली. आजवर आमचा परिपाठ असा. आपण परदेशांकडून अन्न-मदत घेत राहिल्याने आपली 'पत' कशी घसरली आहे, अनेकदा मानहानी कशी पत्करावी लागली आहे, हे राजाभाऊ कुलकर्णी यांनी प्रास्ताविकादाखल सांगायचे. यामुळे आम्ही राजाभाऊंना किंवा त्यांची भूमिका पार पाडणाऱ्या प्राथमिक परिचयवक्त्याला 'पतवाले' म्हणत असू.

**श्री. ग. मा.**

# १०

यानंतर आमचे जोशीबुवा सरसावत. ते सर्वोदयी कार्यकर्ते. शेतीची, खतांची बरीच माहिती त्यांच्याजवळ तयार. ‘आपली गेलेली पत’ परत मिळवायची असेल तर परदेशांवर अवलंबून राहण्याची सवय आपण सोडून दिली पाहिजे. आपल्या आसपास जी नैसर्गिक संपत्ती वाया जात आहे, तिचा आपण कटाक्षाने वापर केला पाहिजे,’ अशी प्रस्तावना करून ते ‘खते’ या विषयावर बरीच माहिती शेतकऱ्यांना सांगत. सोनखत, शेणखत, हिराखत इत्यादी खतांचे प्रकार, ते जमा करण्याच्या पद्धती वगैरे त्यांनी सांगितलेले ज्ञान बहुतेक ठिकाणी शेतकऱ्यांनी उत्सुकतेने ग्रहण केले, तुरळक ठिकाणी त्यावर चर्चाही झाल्या. शिवाय जोशीबुवांच्या सांगण्यात एक प्रकारचा ठाशीवपणा असे त्याचाही परिणाम होई. ‘अमुक अमुक पद्धतीने खत गोळा करा, शेतात टाका. उत्पन्न इतके वाढेल. आम्ही प्रयोग करून पाहिले आहेत. नाही उत्पन्न वाढले तर मला विचारा.’ जोशीबुवांचे हे ‘मला विचारा’ इतक्यांदा होई की, आम्ही त्यांना विनोदाने म्हणत असू, ‘जोशीबुवा, खरोखरच या लोकांनी तुम्हांला विचारायचे ठरवले, तर त्यांनी तुम्हांला गाठायचे कुठे? तुमचा ठिकाणा काय? तुम्ही तर आज इथे, उद्या तिथे. तुमचा काही कायमचा पत्ता आहे का?’ पण जोशीबुवांना हे काही पटत नसे. त्यांचे आपले ‘मला विचारा’ हे शेवटपर्यंत चालूच राहिले. वर पुन्हा “शेतकऱ्यांना हे असेच ठासूनठोकून सांगावे लागते. तुमची ‘विचार करा’ ही भाषा इथे चालायची नाही” हे त्यांचे आम्हालाच सांगणे असे.

यामुळे जोशीबुवांचे नाव ‘खतवाले’ असे पडले होते.

शेवटी श्री. ग. मा. "शेती, उद्योगधंदे, शिक्षण या सर्वच क्षेत्रांत आज बोकाळलेली परावलंबी वृत्ती आपल्याला नष्ट केली पाहिजे. त्याशिवाय आपले कुठलेच प्रश्न सुटणार नाहीत. अन्नापासून ही सुरुवात आहे. 'परदेशी अन्न-मदत बंद करा' असे आपण सरकारला एकमुखाने सांगू." असा समारोप करीत व या आशयाचा एखादा ठराव सभेपुढे ठेवून त्याला मान्यता घेत. यामुळे 'मतवाले' ही पदवी त्यांना मिळाली होती.

असे हे 'पत'वाले, 'खत'वाले आणि 'मत'वाले गावोगाव सभा घेत, नगर जिल्ह्यातील नेवाशाच्या पुढे 'बेलपिंपळगाव' येथे पोहोचले, तेव्हा गावातल्या एका भिंतीवर, त्यांना या तिन्ही शब्दांचा उपयोग करून एक म्हण मोठ्या अक्षरांत लिहिलेली आढळली—

**गावात एकमत**
**शेतात सोनखत**
**सुधारा देशाची पत**

नुकताच या गावी ग्रामगौरव समारंभ पार पडला होता. ग्रामगौरव म्हणजे शंभर टक्के गाव साक्षर झाल्याची निशाणी. या समारंभापूर्वी गावातल्या भिंती निरनिराळ्या म्हणींनी रंगवून काढण्याचा एक कार्यक्रम बहुतेक ठिकाणी होत असतो. या म्हणीही गावकऱ्यांनी व विशेषतः गावशाळेच्या शिक्षकांनीच तयार केलेल्या असतात. महाराष्ट्रभर अशा गावांतून हिंडून कोणी या म्हणी नुसत्या एकत्रित केल्या तरी लोकसाहित्यात काही नवीन भर पडेल; निदान स्वातंत्र्योत्तर काळातील, ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासप्रवृत्तींचे काही रेखाटन तरी त्यावरून खचित करता येईल, असे काही काही भिंती पाहून तर तीव्रतेने वाटले.

वेल्होळीला राजाभाऊ कुलकर्णी नसल्याने घडी वेगळी बसणार, खत–पत–माताचं नेहमीचं त्रिकूट विस्कटणार याची कल्पना थोडीफार होतीच. पण नवीन घडी इतकी चांगली जमेल असेही वाटले नव्हते. संचलनाच्या सुरुवातीला काही दिवस बरोबर असलेले, नंतर गावी परतलेले व पुन्हा आज सामील झालेले मराठवाड्यातील कार्यकर्ते श्री. गंगाधर नलावडे यांनी सभेची सुरुवातच वेगळ्या भाषणाने केली. ते म्हणाले—

‘काल दिवसभर आम्ही प्रवासात होतो. संचलन सोडल्यावर मधल्या महिन्याभरातही मराठवाड्यात कामासाठी सारखे हिंडत होतो. आम्ही संचलनासोबत काही दिवस होतो, असे कळल्यावर लोक उत्सुकतेने माहिती विचारीत, ज्या भागातून संचलन गेले तेथे तर घरच्या मंडळींची चौकशी करावी, तशा आस्थेने संचलनाच्या पुढील मुक्कामांची हाल-हवाल, ख्यालीखुशाली विचारली जाई. संचलन कुठवर आले, कार्यक्रम कसे होतात, मराठवाड्यात जशी लोकांनी साथ दिली, तशी इतरत्र मिळते की नाही, सरकारवर याचा काही परिणाम होणार आहे का, संचलनानंतरचा कार्यक्रम काय, अशा अनेक शंका, प्रश्न आम्हांला विचारले जात आणि आम्हीही सुचतील तशी उत्तरे देत असू. यावरून इतके निश्चित की, निदान आमच्या भागात तरी या वेगळ्या विचारां-विषयी कौतुक आहे, तो पसरावा, त्याचे परिणाम दिसावेत, अशी लोकांची मनापासून इच्छा आहे. मला स्वतःला हा विचार फार पटला, यात पक्षबिक्ष काही नाही, निवडणुकांची दृष्टी नाही, म्हणून तो जास्त आवडला आणि म्हणून मी सुरुवातीलाच सामील झालो. मी स्वतः तिथे कम्युनिस्ट पक्षाचे काम करतो. माझ्याप्रमाणेच इतरही पक्षांचे कार्यकर्ते याकडे ओढले गेल्याचे मला माहीत आहे. पुढे काय हे आज कोणीच सांगू शकणार नाही. यांनी विचाराची दिशा सांगितली, पुढची जबाब-दारी वास्तविक आपली आहे–विशेषतः शेतकरीसमाजाची ’...

आणखी बरेच काही नलावडे सांगत होते. त्यांच्या सांगण्यातला नवीनपणा, ताजेपणा जाणवत होता. त्यामुळे भाषण लांबले तरी ऐकावेसे वाटत होते.

यानंतर विनायकराव पाटील बोलले. शेतकऱ्यांनी जबाबदारी कशी उचलायची याचे उदाहरण म्हणून त्यांनी निफाड तालुक्यातल्या अकरा गावांची माहिती सांगितली. ‘निफाड तालुक्याला वास्तविक बाहेरून धान्य आणण्याची काही गरज नव्हती, नाही. खूप पिकवणारा हा भाग आहे. पण हजारो क्विंटल परदेशी धान्य या तालुक्यात येतच होते, अजूनही येते. आमच्यापैकी अनेकजण हे धान्य स्वस्त मिळते, म्हणून गुराढोरांना खाऊ घालण्यासाठीही याचा उपयोग करतात. यात काही तरी चूक आहे, आपल्या देशाचे फार नुकसान होते आहे, याची कुणाला

जाणीवच नव्हती. शिवाय आपल्या अब्रूचाही प्रश्न आहे. किती बदनामी परदेशांत आपली होते आहे ! म्हणून आमच्या तालुक्यातल्या अकरा गावांनी ठरवले की, परदेशी अन्नधान्याचा एक कणही गावात येऊ द्यायचा नाही. जी काही तूट आहे ती आपापसांत भरपाई करून वाटून घ्यायची. परदेशांतील लहान मुलांनी आपल्यासाठी उपास काढावेत आणि हे मुलांच्या तोंडचे घास आम्ही गिळावेत, याची शेतकरी म्हणून मलातरी लाज वाटली, आपल्या सर्वांनाच हे कळल्यावर ती वाटल्यावाचून राहणार नाही. अशी तूट–तूट ती आहे किती ? फक्त दहा टक्के. मला वाटतं आपण मनावर घेतले तर ही अन्नतूट भरून काढणे मुळीच अवघड नाही. नुसते उंदीर मारले तरी हा प्रश्न मिटेल. शिवाय आपली उत्पादनाची ताकदही काही कमी नाही. आमच्या आजोबांना एकरी वीस टन ऊस निघाला की खूप निघाला असे वाटत असे. आज आम्ही एकरी शंभर शंभर टन पीक घेतो. गव्हाच्या, ज्वारीच्या बाबतीतही तेच. दोन वर्षांपूर्वी 'कुठूनही पाणी उचला' अशी सरकारने नुसती परवानगी दिली तर आमच्या तालुक्यातले गव्हाचे उत्पादन चौपट वाढले. आपण आता सरकारला सांगितले पाहिजे की ही परदेशी अन्नमदत बंद करा, तूट भरून काढण्याइतकी ताकद आमच्यात आजही आहे.' .......

'विनायकरावांनी निफाड तालुक्यातील 'परान्नमुक्त' अकरा गावांचे उदाहरण आपल्याला दिले. तुम्ही तेच गिरवा असे माझे म्हणणे नाही. स्थानिक परिस्थिती वेगळी आसण्याचा संभव आहे, तुमचा आविष्कार तुमच्या परिस्थिनीनुरूप वेगळा असला तर काही बिघडणार नाही. स्वावलंवनाची प्रेरणा महत्त्वाची आहे, मार्ग वेगवेगळे असतील, नव्हे असणे चांगलेही. एकच चित्र सगळ्यांनी कशाला गिरवायचे ? प्रत्येकाने वेगळे रंग भरावेत, नवे नवे प्रयोग करावेत. हे सारखं नवं नवं घडवण्याची, सतत धडपडण्याची वृत्ती आपल्यात निर्माण झाली नाही हे आपले गेल्या वीस वर्षांतील नियोजनाचे खरे अपयश आहे. परक्या, श्रीमंत देशांची नक्कल करून मोठे होण्याचा आपण प्रयत्न चालविला आहे, तो चुकीचा आहे; याने आपण केव्हाही मोठे होणार नाही; श्रीमंत

होणार नाही; मोठेपणाचे व श्रीमंतीचे जे एक वेगळे तेज असते ते कधीही आपल्यावर चढणार नाही हे सांगण्यासाठी आम्ही मंडळी येथे आलो आहोत. अन्न हा एक निकडीचा विषय निमित्त म्हणून घेतला आहे. पण त्यामागची मुख्य भावना आहे स्वतंत्रतेची. या संचलनाला अन्न-स्वावलंबन संचलन असेही म्हणता आले असते. पण मुद्दामच स्वतंत्रता संचलन असे म्हटले आहे. वीस वर्षांपूर्वी राजकीय स्वातंत्र्य आपल्याला लाभले. पण आपल्या पायांवर उभे राहण्याची विद्या आपण हस्तगत केली नाही म्हणून आज आर्थिक गुलामगिरीत पुन्हा पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. आपले तंत्र, आपली बुद्धी व आपली साधनसामग्री यांच्या बळावर आपल्यालाच विकसित करावे लागते, शोधावे लागते, परदेशांतून आयात करता येण्यासारखी ही वस्तू नाही हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. परदेशातून फार तर निर्जीव, जड यंत्रसामग्री येऊ शकते. पण यामागचे बुद्धिचैतन्य, ज्ञानविज्ञान येथेच खस्ता खाऊन, येथल्याच मातीत पिकवावे लागते. ही स्वाभाविक वाढ होण्यासाठी आपण प्रथम परदेशांतील आयात कमी केली पाहिजे. अन्नाची तर प्रथमच. वीस वर्षे आपण परदेशांतून अन्न आणतो ही केवढी लाज आणणारी गोष्ट आहे! आणि म्हणे हा देश शेतीप्रधान आहे. एके काळी सुवर्णभूमी म्हणून या देशाचा लौकिक होता! पुन्हा हा लौकिक प्रस्थापित करणे शक्य आहे. निर्धाराची, थोडया आत्मविश्वासाची फक्त निकड आहे' असा काही तरी श्री. ग. मा. यांनी केलेला शेवट होता. नक्की व सुसंगत आज इतक्या दिवसांनंतर काही आठवत नाही.

तसं नक्की आणि संगतवार असं या सभेचं, दिवसाचं काहीच आठवत नाही. आठवतं ते इतकचं की दिवस फार चांगला गेला, सभा खूप रंगली, रात्रही गाढ शांततेत व्यतीत झाली. माणसे किती छान वागली! वेशीवर पाच पन्नास माणूस तरी सकाळी घ्यायला जमला होता. उतरण्याची सोय शाळेत होती. जागा किती स्वच्छ, सारवून ठेवली होती! पिण्याचे पाणी, वापरायचे पाणी दोन वेगवेगळ्या, घासूनपुसून चकचकीत केलेल्या पितळी पिंपात ठेवलेले इथे प्रथमच आढळले. जेवायची वेळ चुकली नाही, की जेवताना अवाजवी आग्रह झाला नाही. विश्रांतीच्या

वेळात कोणी येऊन बोलत बसले नाही. धुळवडीचा हा दिवस होता, संध्याकाळ मुलांचे खेळ पाहण्यात गेली. खेळ संपल्यावर सभा. तीच मंडळी सभेसाठी येऊन बसली. दोन तीन सरकारी आधिकारी सभेसाठी मुद्दाम आलेले होते. एका फळचार हिंदुस्थानचा नकाशा काढून त्यावर 'वेरूळ ते मुंबई' हा अन्नसंचलनाचा मार्ग खडूने रेखित केलेला होता. कसलाही औपचारिकपणा सभेत दिसत नव्हता, तरीही एक आदब होती. शिस्त होती. स्वागताची भाषणे नाहीत, आभाराची लांबड नाही. सारे कसे निवांतपणे चालू होते.

सभा संपल्यावर तीन मैलांवर असलेल्या सभापतींच्या गावी जाऊन त्यांच्याकडे जेवून आलो. सगळ्यांना वाटत होते या चांदण्यात लहानशी सहल काढावी. शेजारच्या टेकडीवर चढून जावे, लांबवर पसरलेल्या रस्त्याच्या काळ्या ओढणीवर पडून राहावे, नाचावे, सूर लावावेत मला मात्र स्वस्थ, एकट्याने उघड्यावर कुठेतरी बसून राहावेसेच फक्त वाटत होते. एकान्तात गेल्याशिवाय हे समाधानाचे कढ मला आवरता येणार नव्हते. हा तृप्तीचा उल्हास सामावून घेतला जाणार नव्हता.

तसे काहीच नवीन घडले नव्हते. पण ही झुळझुळती प्रसन्नता, हे सळसळणारे चैतन्य आज नवीन होते. इथे व्याकुळता होती पण दुःख नव्हते. ओढ होती, आतुरता होती, पण वेदना नव्हती, एक वेदना मात्र हळूच एकदा चमकून गेली......आपण कवी असायला हवे होते. हे सारे सौंदर्य आपण कसे व्यक्त करणार ?

# आत्मवंचनेसाठी आणखी एक कायदा !

गेल्या वर्षभरात पक्षान्तराच्या सर्कशीचे इतके खेळ झाले की आता या खेळांना कायद्याने बंदी केली पाहिजे असे केंद्र सरकारला वाटू लागले आहे. पक्षांतर करून स्वार्थ साधणाऱ्या व्यक्तीविरुद्ध दंडयोजना केली पाहिजे असे गृहखात्याचे मत असून त्याला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी कायदा खात्यातील तज्ज्ञ मंडळी विचार करण्यात मग्न झाली आहेत.

उत्तर प्रदेश, हरयाना आणि मध्य प्रदेश या तीन राज्यांतील काँग्रेस मंत्रिमंडळे पक्षान्तराच्या साथीला बळी पडल्यामुळे ही साथ थांबविण्यासाठी काही तरी केले पाहिजे असे केंद्रस्थित काँग्रेसी राज्यकर्त्यांना वाटणे साहजिक आहे. आपल्या पक्षावर गडान्तर आल्यानंतर काँग्रेस पक्षाला आता हा शहाजोगपणा सुचत आहे. कारण पक्षान्तराच्या या साथीला काँग्रेसनेच खतपाणी घातले आहे, असा गेल्या वीस वर्षांतील अनुभव आहे. विरोधी पक्षातील कोणते कार्यकर्ते मानमरातबाची खिरापत वाटताच आपल्या कच्छपी लागतील याचा अंदाज घेऊन त्यानुसार पावले टाकण्यात काँग्रेस नेत्यांना कधीच संकोच वाटला नाही. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे तर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती दृष्टिपथात येताच विरोधी पक्षांतील सत्ताकांक्षी व्यक्तींना आपल्या जाळ्यात खेचण्याची कारवाई किती भराला आली होती हा इतिहास काही फार जुना झालेला नाही. आपल्या पक्षाचे व तदनुषंगाने आपले स्थान बळकट करण्यासाठी सामाजिक अभिसरणाच्या गोंडस नावाखाली जातीयवादाचा प्रच्छन्न पुरस्कार करण्यात आला होता. शेतकरी कामगार पक्षातील पडझडी या दृष्टीने बऱ्याच बोलक्या आहेत.

महाराष्ट्रात काँग्रेसशिवाय कोणताच पक्ष फारसा लोकप्रिय नाही हे सिद्ध करण्यासाठी जिल्हा परिषदांपासून संसदेपर्यंतच्या जागांचे वाटप करताना आपले आतापर्यंतचे राजकीय धोरण आणि ध्येयवाद यांच्याशी सोईस्कर घटस्फोट घेणाऱ्यांना अग्रक्रम दिला जात आहे अशी तक्रार जुने काँग्रेसजनच तेव्हा करीत होते. कालपर्यंत जो विरोधी पक्षात वावरत होता त्याला एकदम प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणिसापर्यंत बढती देऊन पक्षान्तराच्या कर्तृत्वाबद्दल पारितोषिके वाटली जात होती. महापालिकेच्या प्रांगणात वावरणारे कार्यकर्ते विधान परिषदा आणि राज्यसभा यांच्या आवारात पोचून काँग्रेसप्रणित समाजवादाचे आपणच सच्चे पाईक आहोत आणि म्हणून काँग्रेसच्या अध्यक्षपदावर आपला रास्त अधिकार पोचतो असा दावा करू लागले. या मागे बोलविता धनी कोण आहे आणि या धन्याचे

मनोगत कोणते आहे हे समजून घेणे फारसे अवघड नाही. उदात्त तत्त्वज्ञानाच्या कोणी कितीही गप्पा मारोत, पक्षान्तर करून कॉंग्रेसच्या कळपात घुसणारे कार्यकर्त आणि त्यांच्या स्वागतासाठी आपले खादीधारी बाहू उंच उभारून सिद्ध असलेले हसतमुख नेते कोणती व्यावहारिक गणिते मांडून हा सारा खेळ करीत होते, हे या नवागतांना कॉंग्रेस संघटनेत जी मानाची पाने दिली गेली त्यावरून सहज उमगून येते. प्रत्येक माणूस खरीदता येतो असे वॉलपोल म्हणत असे. त्याच्या या उक्तीत किंचितही अतिशयोक्ती नाही हे कॉंग्रेस श्रेष्ठांनी सिद्ध करून दाखविले आहे.

## सत्तास्पर्धेचा स्वार्थी खेळ

गेल्या वर्षी सार्वत्रिक निवडणुका होईपर्यंत ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत सर्वत्र कॉंग्रेसचे हुकमी बहुमत असल्यामुळे इतर पक्षांकडून कॉंग्रेसकडे जाणाऱ्या मार्गावर इच्छुकांची गर्दी झालेली दिसायची. गेल्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेसला मतदारांनी अभूतपूर्व हादरा दिल्यानंतर पाचसहा राज्यांमध्ये कॉंग्रेसेतर पक्षांची सरकारे अस्तित्वात आली. त्यानंतर आतापर्यंतच्या एकेरी वाहतुकीची दिशा बदलली. उत्तर प्रदेशातील चरणसिंगांचा किंवा हरयानामधील बीरेंद्रसिंगांचा गट राज्यकारभारात आपल्याला अपेक्षित महत्त्व मिळाले नाही असे आढळून येताच कॉंग्रेस पक्षाच्या कळपातून बाहेर पडून संयुक्त विधायक दलाशी सहकार्य करू लागला. या त्यांच्या पक्षान्तरामागेही कोणताच ध्येयवाद नव्हता. पश्चिम बंगालमध्ये अस्तित्वात आलेली बंगला कॉंग्रेस ही संघटनाही अतुल्य घोष यांच्या एकतंत्री अंमलाविरुद्ध आपला असंतोष व्यक्त करण्यासाठीच जन्माला आली. या बंगला कॉंग्रेसला निवडणुकीत भरघोस यश मिळाले आणि त्यामुळे पश्चिम बंगालमध्ये अतुल्य बाबूंचे हस्तक असलेले प्रफुल्लचंद्र सेन यांना मुख्य मंत्रिपदावरून दूर व्हावे लागले आणि त्यांच्या जागी अजय मुखर्जी यांचे संमिश्र मंत्रिमंडळ अधिकारावर आले. तेव्हापासून बंगाली कॉंग्रेसवाल्यानी पक्षान्तर करून बंगाल कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला.

ज्याप्रमाणे कॉंग्रेसश्रेष्ठांनी इतर पक्षांशी घटस्फोट घऊन वैयक्तिक महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी कॉंग्रेसचे सदस्यत्व स्वीकारलेल्यांचे स्वागत करून त्यांच्या या बंडखोरीचे पारितोषिक दिले तेच तंत्र संयुक्त दलांनीही राजरोस आचरले. चरणसिंगांच्या बंडखोरीमुळे आपले मंत्रिमंडळ अस्तित्वात येण्याची शक्यता निर्माण झाली, या जाणिवेने संमिश्र विधायक दलाने मुख्य मंत्रिपदाची खुर्ची चरणसिंगांसाठी राखून ठेवली. हरयाना आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांतील कॉंग्रेस मंत्रिमंडळाचा पाडाव करताना हाच प्रयोग करण्यात आला होता. आपलेच तंत्र आपल्यावर उलटलेले पाहताच चिडलेल्या कॉंग्रेसजनांनी बिहारमधील महामायाप्रसाद सिन्हा यांची व पंजाबमधील गुरुनामसिंग यांची राजवट उलथून पाडण्यासाठी पक्षान्तराला राजरोस पाठिंबा दिला होता. पंजाबमध्ये आजही ग्यानसिंग रारेवाला

यांचा गट लक्ष्मणसिंग गिल यांच्या मंत्रिमंडळाविरुद्ध कारवाया करीत आहे. या पक्षान्तराच्या प्रवृत्तीच्या बळावरच मध्यप्रदेशातील गोविंदनारायण सिंग यांची राजवट खाली खेचता यावी यासाठी आदिवासी जमातीच्या आमदारांना चिथावण्याचा प्रयोग श्यामनंदन मिश्रा करीत आहेत. त्याला तरी दुसरा कोणता आधार आहे ? बिहारमधील आपली राजवट खाली खेचण्यासाठी काँग्रेसचे महेशप्रसाद सिन्हा यांनी आणि त्यांच्याशी हातमिळवणी केलेल्या बिंदेश्वरीप्रसाद मंडल यांच्या शोषित दलाने एक एक मत काही लाख रुपयाला खरेदी केले असा उघड आरोप महामायाबाबूंनी केला होता. हा आरोप खोटा आहे असे म्हणण्याचे कोणीही धारिष्ट दाखविलेले नाही, यावरून आपल्या लोकप्रतिनिधींच्या वर्तनाची पातळी कोठवर गेली आहे याचा बोध व्हायला हरकत नाही.

अशा रीतीने सत्तास्पर्धेचा निव्वळ स्वार्थी खेळ खेळण्यात तरबेज असलेली ही मंडळी केवळ कायद्याच्या धाकाने पक्षान्तर करणार नाहीत असे मानणे सर्वथैव चुकीचे ठरेल. किंबहुना पक्षान्तरास बंदी करणारा कायदा होताच ही प्रवृत्ती निराळ्या नावाखाली उफाळून येण्याची शक्यताच अधिक. ज्याप्रमाणे दारूबंदीचा कायदा होताच मुंबईसारख्या अफाट लोकवस्तीच्या शहरातील बेकायदा दारूभट्ट्यांची संख्या अतोनात वाढली आणि या बेकायदा व्यवहाराला संरक्षण देणाऱ्या सरकारी सेवकांना हप्त्यांच्या रूपाने एवढी रक्कम मिळू लागली की दारूबंदी असणेच श्रेयस्कर असे ते निराळ्या कारणाने म्हणू लागले. आयात परवान्यांचा गैरवापर करणारी किती तरी प्रकरणे आढळून येत असताना हा गुन्हा करणाऱ्यांकडे दुर्लक्ष केले जाते असेच दृश्य दृष्टीस पडते. पक्षान्तराला बंदी करणारा कायदा करण्यात आला तर त्याची गत दारूबंदीच्या कायद्यासारखीच होणार यात मुळीच संशय नाही.

सार्वजनिक जीवन चोख असावे असे नुसते म्हणून किंवा तसा एखादा कायदा करून काहीच साध्य होत नाही. स्वतःच्या वैयक्तिक हिताला बाजूला ठेवून सार्वजनिक जीवनातील पवित्र मूल्यांची जोपासना करण्याचा निश्चय करण्यात आला तरच आजच्या बेताल वर्तनाला काही प्रमाणात तरी आळा बसू शकेल. परंतु एवढा प्रामाणिकपणा दाखविण्याची कोणाचीच तयारी दिसत नाही. आपल्याला सोईचे असणारे पक्षान्तर स्वागतार्ह आणि आपली खुर्ची ओढून घेणारे पक्षान्तर निषेधार्ह अशी जोवर सोईस्कर विभागणी मंजूर करण्याचा आपल्या राजकीय नेत्यांना विधिनिषेध वाटत नाही तोवर सध्याच्या परिस्थितीत सुधारणा होण्याची सुतराम शक्यता नाही. कायद्याचे राज्य म्हणजे कायद्यासंबंधी आदर दाखविणारे राज्य, केवळ कायदे वाढविणारे राज्य नव्हे याची जाण जोपर्यंत येत नाही तोवर पक्षान्तराला बंदी करणाऱ्या नव्या कायद्याने आत्मवंचनेशिवाय आपल्या हाती काहीही येणे असंभवनीय आहे. सध्या तरी याच नाण्याची चलती आहे.

**— सदाशिव पेठकर**



जेलरने त्याला कार्यालयात बोलावून सांगितले, 'तुला सोडून देण्यात आले आहे.' आणि त्याबरोबरच तुरुंगातील नोकराने त्याचे जुने कपडे आणि साडेसात रुपये त्याच्यापुढे टवले. सात वर्षेपर्यंत तुरुंगातील कोठडीत राहिल्यानंतर आज जेव्हा त्याला हा शुभ संदेश मिळाला तेव्हा त्याने नियमाप्रमाणे जेलरसाहेबांना नाही सलाम केला की कोणत्याही प्रकारे आनंद प्रकट केला. त्याने सात वर्षांपूर्वी बांधून ठेवलेली तुमान आणि खामिस यांकडे डोळे फाडून एक वेळ पाहिले व

रा. चिं. भावे

तर त्याची दृष्टी मेजावर पडलेल्या सात रुपयांवर स्थिर झाली. कोणच्या विचाराने कोणास ठाऊक पण त्याचा चेहरा थोडा खुलला. त्याने न बोलता आपले जेलमधील कपडे काढून ठेविले, आपले कपडे घातले आणि त्या रुपयांकडे तुच्छतेने पाहून खमिसाच्या खिशात टाकले. नंतर त्याने आपला हात जेलरच्या समोर धरला सलामाच्याऐवजी कैद्याने आपला हात पुढे केलेला पाहून क्षणभर तो कुंठित झाला. पण पुन्हा हसून त्याने कैद्याचा हात प्रेमाने हाती घेतला. म्हातारा जेलर हसत हसत म्हणाला, सरदार, अरे तू एक साहसी मनुष्य आहेस. तीन वर्षे तू माझ्या बरोबर आहेस. या मुदतीत तुझ्या माझ्यात कितीदा तरी झगडे झाले आहेत. तुझे मागील रेकॉर्डही चांगले नाही. परंतु मी तुझ्यातील गुण ओळखले आहेत. तुला दबून राहण्याचे माहीत नाही. तू जर या गुणांचा योग्य तऱ्हेने उपयोग करशील तर तुला अजूनही तुझे जीवन सुधारता येईल. तू आता तुझा पूर्वीचा तो पेशा सोडून दे, तो म्हणजे अर्थात दरोडे घालणे व खून करणे. ' खून करणे हा माझा पेशा नाही पण कधी कधी तो काही प्रसंगांत नाइलाजाने करावा लागतो.' तो म्हणाला. 'नाही नाही, माझ्या मित्रा, कोणत्याही परिस्थितीत खून करू नको. कबूल कर की तू एक चांगल्या माणसाप्रमाणे यापुढे आपले जीवन जगशील.'

कैद्याने हसून म्हाताऱ्या जेलरच्या हातात हात दिला आणि म्हणाला, "जेलरसाहेब, मी आपल्या सांगण्याप्रमाणेच करीन." असे म्हणून त्याने दरवाजाकडे आपली पावले टाकली.

# मनुष्याचे मोल

बाहेर कोवळी उन्हे पडली होती. रस्त्यावर काही सद्गृहस्थ हवा खाण्यास बाहेर पडलेले दिसत होते, त्यांत एखाद दुसरे जोडपेही होते. स्त्रिया प्रभातकालीन वाऱ्याचा आनंद रंगी-बेरंगी पक्षांप्रमाणे घेत होत्या. एक मजूर दांपत्य उंच स्वराने गाणे गात चालले होते. उन्हात चमकणाऱ्या डांबरी रस्त्यावर मधून मधून मोटरगाड्या वेगाने जात होत्या. रस्त्याच्या कडेला एक म्हातारा आपले दुकान थाटीत होता.

कैद्याने हे सर्व पाहिले. सात वर्षांनंतर त्याच्यासमोर विस्मृत जगातील काही दृश्ये तरळत होती. तो कधी चालत्या फिरत्या जगाकडे पाहात होता तर कधी कधी आपल्या भूत भविष्याचा विचार करीत पुढे चालला होता. अशा रीतीने चालताना अकस्मात तो रेल्वेस्टेशन जवळ आला. थोडा वेळ थांबून विचार करीत उभा राहिला व नंतर निश्चितपणे पावले टाकीत तो तिकीट ऑफीसच्या समोर येऊन उभा राहिला. खमिसाच्या खिशात हात घालून त्यातील सर्व पैसे काढून ते खिडकीत बेदरकारपणे फेकून म्हणाला, 'दिल्लीचे एक तिकीट.'

तिकीट मास्तरने पाहिले, दिल्लीच्या तिकिटासाठी जरूर असलेल्या रकमेपेक्षा ते पुष्कळच जास्त होते. त्याने त्याला विचारले ' कोणत्या वर्गाचे.'

कैद्याने बेदरकारपणाने उत्तर दिले, ' तुम्हांला लागेल त्या वर्गाचे.'

मास्तरने रुपये मोजले आणि दुसऱ्या वर्गाचे एक तिकीट त्याला दिले. एक उडती नजर त्याने तिकिटावर टाकली व काही बडबड करीत तो प्लॅटफॉर्मकडे चालला.

गाडी येण्यास उशीर होता. त्याला भूक लागली होती. स्टेशनवर चहा, टोस्ट, पुरी, भाजी, मिठाई व फळे विकली जात होती. परंतु त्याच्या खिशात या वेळेस एक पैसाही नव्हता. तो स्वतःशीच हसला आणि प्लॅटफॉर्मच्या एका टोकाला गाडीची वाट पाहात उभा राहिला.

तो दिल्लीला पोचला तेव्हा दिवस संपत आला होता. तरीपण अद्यापही ऊन चांगलेच ताप देत होते आणि त्यातच भुकेने त्याला जास्त त्रास होत होता. दिल्लीत त्याचा कोणी मित्र नव्हता. स्टेशनच्या बाहेर पडल्यावर थोडा वेळ विचार करून तो पुढे चालू लागला. सडकेच्या दोन्ही बाजूंला खाण्या–पिण्याची दुकाने होती. काही उपाहारगृहे होती. त्याच्या मनात विचार आला की, आजच मला पोटासाठी तोच उद्योग करावा लागेल की, जो यापुढे न करण्याचे मी म्हाताऱ्या जेलरला वचन दिले आहे.

समोरच एक छानदार हॉटेल पाहून तो धैर्याने त्यात शिरला व एका रिकाम्या मेजापाशी ऐटीत बसला. हॉटेलचा छोकरा त्याच्यासमोर आला तेव्हा त्याने त्याला खाण्याच्या पदार्थांची ऑर्डर दिली. खाणे झाल्यावर त्याने बिल मागितले. बिल मिळाल्यावर त्याने दौत व टाक मागवून त्या बिलाच्या पाठीमागे लिहून दिले की ' या बिलाचे पैसे पुढे केव्हातरी दिले जातील ' हॉटेलचा पोऱ्या त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागला. याप्रमाणे त्याला पाहताना पाहून त्याने जोराने सांगितले की ' हा कागद मॅनेजरला दे. '

कागद पाहून मॅनेजर त्याच्या टेबलापाशी आला. त्याने पाहिले एक दणकट माणूस बेदरकारपणे खुर्चीवर बसला आहे. मॅनेजर म्हणाला, ' बिलाचे पैसे का देत-नाही ?'

' काय तुम्हीच मॅनेजर आहात ;'

मॅनेजरने नरमाईने सांगितले, 'होय साहेब.'

'बिलाच्या पशाविषयी त्याच्या पाठीमागे लिहिलेच आहे की, ते पुढे केव्हातरी चुकते करण्यात येतील.' 'पण असे का ?' 'कारण आता माझ्याजवळ पैसे नाहीत.' 'मग फराळ का केलात ?' 'भूक लागली होती म्हणून.' 'तुम्ही विचार करावयास हवा होता की फराळ केला तर पैसे द्यावे लागतील.' 'हे मला माहीत आहे.' 'मी समजलो तुम्ही एक सभ्य गृहस्थ आहात.'

'सभ्य गृहस्थ नसतो तर तुझी तिजोरी फोडून त्यातील सर्व पुंजी घऊन जाऊन नंतर महिनाभर तुला थोडे थोडे देऊन रोज सलाम घेतले असते.'

प्रश्नोत्तरे कुतूहलपूर्ण होती. ऐकणाऱ्याचे कुतूहल वाढत चालले. एकाने विचारले, 'आपण कोण आहात ?'

मी एक खुनी डाकू आहे.

हे ऐकताच तेथे बसलेल्या सर्वांनी आश्चर्याने त्याच्याकडे पाहिले. काहींनी त्याला घेरले. मॅनेजरला घाम सुटला.

एका प्रतिष्ठित माणसाने पुढे येऊन विचारले, 'आपण कोठून आलात.'

जेलमधून.

'बहुधा बऱ्याच मुदतीची शिक्षा भोगलेली दिसते.' 'होय पुरी सात वष.' थोडा वेळ तो स्तब्ध होऊन त्या व्यक्तीच्या चमकत्या डोळ्याकडे पाहात राहिला आणि नंतर खिशातून मनिबॅग काढून त्याच्या बिलाचे पैसे चुकते केले व त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला,

या माझ्याबरोबर.

त्या सद्गृहस्थाने त्याची सर्व हकीकत ऐकली व विचारले, 'जेलरसमोर केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणे वागणार आहेस तर ?'

'होय. तसाच लाचारीचा प्रसंग न आला तर' तो उत्तरला. 'माझ्याबरोबर काम करशील ? पण खूप मेहनत करावी लागेल.' 'काय डाके घालण्यापेक्षाही अधिक.' तो हसला, त्याने विचारले मला प्रथम हे सांगा की, 'आपण माझ्यावर विश्वास ठेवाल ना ?'

का नाही ? जरूर ठेवीन.

पण मी एक खुनी डाकू. शिक्षा झालेला. जेलमधला कैदी.

'मला तर तू एक तेजस्वी, साहसी आणि प्रामाणिक पुरुष दिसतोस. तुझ्या निर्भयतेवर मी मोहित झालो आहे. जर तू माझ्याबरोबर काम करशील तर माझ्या कंपनीत माझ्यानंतर तूच अधिकारी समजला जाशील.'

'पण मी काही विशेष शिकलेलो नाही.'

'सही करता येते ना ?'

'करावी लागलीच तर करीन.'

'तर मग आजपासून तू माझा मुख्य सहायक झालास. मी कॉंट्रॅक्टर आहे. मोठमोठी कामे घेतो. लाखोचा कारभार करतो. हजारो माणसांशी देण्याघेण्याचा व्यवहार चालतो. हे सर्व तुला करावे लागेल.'

'मी करीन पण पगार,'

'पगार काही नाही !'

'खाणार कोठून ?'

'जिथे मी खातो तेथून.'

'बरे. माझे नाव नरेंद्रसिंह आहे. आपण मला सरदार नरेंद्रसिंह म्हणं शकता.'

'अहो नरेंद्रसिंह मी प्रथम तुमच्या साहसाची परीक्षा घेणार आहे. मी तुला वाघाच्या तोंडी देईन.'

'वाघाच्या तोंडी काय म्हणून ?'

'त्याचे दात मोजण्यासाठी.'

'कॉंट्रॅक्टरने हसून सांगितले की, एक्झिक्युटिव इंजिनियर अंडरसन माणसाला पाहिल्याबरोबर जणू खायला धावतो.'

'ही बिले घे. मंजूर करवून आण. सहा महिने झाले बाकी आहेत.'

'नरेंद्रसिंहानें गुपचुप बिले घेतली.'

ती घेऊन तो एक्झिक्यूटिव इंजिनीयरच्या बंगल्यावर गेला.

'तुम कौन हो.' साहेबाच्या मॅडमने विचारले.

'मी सरदार नरेंद्रसिंह आहे.'

'मला तुमची जरूर नाही. बाहर जावो.'

'मी तर ऐकले होते को साहेबच फक्त रागीट आहेत. आपली काही तशी कीर्ती ऐकली नव्हती.'

'कसली कीर्ती ?' मेमसाहेब ओरडल्या.

'आपण माणसाला पाहिल्याबरोबर खायला धावता. आपल्याला माहीत असेलच की आमच्या देशातील स्त्रिया अशा नाहीत. त्या सुशील, मधुर भाषणी आणि आतिथ्यशील असल्या पाहिजेत.'

'तुम कहाँसे आये, तू कोठून आलास ?'

'मला साहेबांशी काम आहे. खासगी नाही. धंद्याविषयी आहे. आपल्याशी माझे काही काम नाही. साहेब कोठें आहेत तेवढे सांगा.'

मेमसाहेब आज जरा विशेष काळजीत होत्या. त्या चांगल्याच चिडल्या होत्या. पण या अद्भुत आणि निर्भय माणसाला पाहून आणि त्याची उत्तरे ऐकून रागाचा त्यांचा पारा बराच उतरला होता. काही वेळ त्या नरेंद्रसिंहाच्या तोंडाकडे पाहात राहिल्या व पुन्हा म्हणाल्या,'

'लेकिन तुम कोन हो ?'

' मी कॉंट्रॅक्टरचा मनुष्य आहे. '

' पण तू कॉंट्रॅक्टरच्या माणसासारखा बोलत नाहीस ? '

' म्हणजे कसा. '

तो सलाम करतो, हुजूर हुजूर असे म्हणतो आणि अदबीने बोलतो आणि असे करीत असूनदेखील त्याच्याबरोबर तुमचा व्यवहार माझ्याशी झाला तसाच होतो ना ? आपल्या देशात विलायतेत बायका पुरुषांबरोबर असेच बोलतात काय ?

' हमको माफ करो मॅन, हम इस बखत झंझटमे है. '

मी नुसता मॅन नाही माझे नाव नरेंद्रसिंह आहे. आपण मला सरदार म्हणून हाक मारू शकता. आपण कोणत्या अडचणीत आहात ते ऐकू तर द्या.

मला पैसे पाहिजेत.

किती ?

दोन हजार रुपये.

आज रुपये हातात नाहीत आणि नाताळासाठी मला कितीतरी खरेदी करावयाची आहे.

' आपल्याला रुपये कधी पाहिजेत ? उद्या सकाळी ? तर मग मी आपल्याला रुपये देईन. काळजी करू नका. '

' थँक यू सरदार, तुमचे रुपये जल्दी परत केले जातील. बरं. ' पण साहेबांची मुलाखत केव्हा घेता येईल. पण तुम्ही तुमची बिले माझ्याजवळ द्या.

'ही घ्या. उद्या सकाळी मी येईन.'

' गुडबाय सरदार, गुडबॉय मॅडम. '

कॉन्ट्रॅक्टर साहेब काही कामासाठी कलकत्त्यास निघून गेले होते. सरदारने मेमसाहेबांना रुपये देण्याचे कबूल केले होते. त्याने शेटच्या तिजोरीचे कुलूप तोडले आणि त्यातून पाच हजार रुपयांच्या नोटांचे एक बंडल काढून खिशात टाकले. हे काम करताना त्याला कोणीही पाहिले नाही. आपले काम पुरे करून सरदार स्वस्थपणे झोपी गेला.

सकाळी उठताच साहेबांच्या बंगल्यावर जाऊन सरदारने मेमसाहेबांची मुलाखत मागितली. या वेळी ती फूत्कार करणारी नागीण नव्हती. एखाद्या पाळीव मांजराप्रमाणे दौडत आली व म्हणाली, " हॅलो सरदार, काय पैसे आणलेस. उद्या माझ्या देशाकडे जाणारे जहाज निघणार आहे. रुपये न मिळाले तर फार अडचण होईल."

' मी रुपये आणले आहेत हे घ्या. थोडे जास्तच आणले आहेत. कदाचित जास्तच लागतील असे समजून. ' सरदारने असे सहज बोलून नोटांचे बंडल मेमसाहेबांच्या हाती दिले.

साहेबाच्या बंगल्यावरून नरेंद्रसिंह जेव्हा आपल्या कचेरीत गेला, तेव्हा त्या

ठिकाणी चांगलीच गडवड उडालेली दिसली. पोलीस पार्टी आपल्या इतमामासह त्या ठिकाणी उपस्थित होती. इन्स्पेक्टरसाहेब तेथील शिपायावर, कारकुनावर आपला रुबाव गाजवीत होते. नरेंद्रसिंह अगदी सहजपणे नेहमीसारखा आपल्या जागेवर जाऊन बसला. मालकाचा तो मुख्य असिस्टंट होता हे सगळयांना माहीत होते. सरदारजीवर चोरीचा आळ कोणीही घेत नव्हते.

पोलीस अंमलदाराने विचारले, ' आपणाला माहीत आहे काय की तिजोरी तोडून कोणीतरी पाच हजार रुपये घेऊन गेले आहेत. सांगा. आपल्याला कोणाचा संशय येतो ?'

' संशय, संशय कसला ?'

' हे काम कोणी केले असेल आपणाला वाटते. या बद्दल आपल्याला काही सागता येईल का ?'

' जरूर. '

' बरे तर आपल्याला काही सुगावा लागला आहे ? '

' अरे वावा रुपये तर काढून घेतलेच आहेत. '

' ते ठीक. पण ते कोणी काढून नेले ?'

' मी. दुसरे कोण ? '

' तुम्ही ! पोलीस अंमलदाराने आ वासून विचारले. '

' होय. '

' आपण रुपये कशासाठी काढलेत ?'

' आवश्यकता होती म्हणून. '

' पण आपण असे करावयास नको होते. '

' काय माझ्यावर आरोप करता ?'

पोलीस अंमलदारालाही राग आला होता. तो म्हणाला, तर आपण कबूल करता की तुम्ही चोरी केली आहे.

' मी तिजोरीतून रुपये घेतले आहेत. '

' कुलूप तोडून ? '

' होय. '

' का ? '

' कारण किल्ली माझेजवळ नव्हती. '

' पण रुपये आपले नव्हते ना ? '

' आपल्याला असे विचारण्याची जरुरी नाही. '

' रुपये कचेरीच्या कामासाठी पाहिजे होते का ? '

' नाही. माझ्या स्वतःच्या कामासाठी. '

' तर मग ते रुपये कोठे आहेत ? '

‘ खर्च झाले. ’

रुपये कोठे आहेत हे आपण सांगणार नाही का ?

नाही.

वरं पाहून घेऊ. आता मी तुम्हांला चोरीच्या आरोपाखाली बंदिवान करतो. आपण पोलीस चौकीवर चला. पोलीस अंमलदाराने सरदार साहेबांना ठाण्यावर नेऊन कोठडीत बंद करून ठेविले.

पुष्कळ तऱ्हेने विचारले तरी त्याने रुपये कोठे ठेवले ते सांगितले नाही. वरील हकीकत कॉन्ट्रॅक्टर साहेबांना तारेने कळविण्यात आली.

तार मिळाल्याबरोबर कॉन्ट्रॅक्टरसाहेब आले. कोर्टात जाऊन त्यांनी लिहून दिले की, सरदारने माझ्या हुकमावरून तिजोरीचे कुलूप तोडून रुपये घेतले आहेत. रुपये माझ्या कामासाठी खर्च झाले आहेत. सरदारांना सोडून द्यावे.

कोर्टाच्या हुकमाप्रमाणे सरदारला हातकड्या काढून घेऊन सोडून देण्यात आले. त्याला आपल्या मोटारीत बसवून कॉन्ट्रॅक्टरसाहेब घरी आले.

‘ मला रुपयांची फार आवश्यकता होती आणि आपल्याला विचारावयास सवड नव्हती, म्हणून असे करावे लागले.’

कॉन्ट्रॅक्टर म्हणाला, ‘सरदार मी यासंबंधी तुला काही विचारले का, रुपये जसे माझे आहेत; तसेच ते तुझेही आहेत. आता यापुढे तिजोरीच्या किल्ल्या तुझ्या-जवळच ठेवीत जा.’

कॉन्ट्रॅक्टरचे उदार हृदय पाहून सरदाराच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले पण त्याने तोंडातून एक शब्दही बाहेर काढला नाही.

सरदारचा पराक्रम इंजिनिअरसाहेब आणि मेमसाहेब यांच्याही कानी पडला. मेमसाहेबांनी सरदारांना पत्र लिहून बोलावले. पत्र खुद्द एक्झिक्युटिव इंजिनियरने लिहिले होते. त्यात त्याने सरदाराला मोठ्या नम्रतेने चहासाठी व मेमसाहेबांनी



जरूर यावे' असा मजकूर स्वत: पाठविला होता.

सरदार बंगल्यावर गेल्यावर साहेब म्हणतात, सरदार जेल कसा काय वाटला.

अरे ती तर एक मजा होती, सरदार म्हणाला.

चहापाणी झाल्यावर साहेब म्हणाले, "सरदार, आम्ही तुम्हांला एका मोठ्या कामाचे कॉन्ट्रॅक्ट देणार आहोत. तुम्ही ते मेहनत घेऊन आणि प्रामाणिकपणाने कराल अशी मला उमेद आहे. आपल्याला सरकारांतून पैसे आधी मिळतील अशी आम्ही शिफारस केली आहे. आम्ही आणि मेमसाहेब आपल्याला आणखी काही पाहिजे असल्यास देण्याची इच्छा करतो.

ममसाहेबांनी कॉन्ट्रॅक्टचे कागद सरदारसाहेबांपुढ ठविले आणि सांगितले, सरदार सही करा, सही करा.

साहेबांनी दाखविल्या ठिकाणी कागदावर सरदारनी आपली सही केली व ते कागद खिशात घालून साहेबाशी हस्तांदोलन करून निघून गेला. कॉन्ट्रॅक्टरने ते कागदपत्र जेव्हा पाहिले तेव्हा तो दंगच झाला. लाखो रुपयांचे काम मिळाले होते. आणि शिवाय सर्व पैसे आगाऊ मिळण्याची सरकारकडे शिफारस करण्यात आली होती. तो म्हणाला, सरदार हा तुमचा विजय आहे, हे काम तुमचे आहे.'

सरदार म्हणाला, नाही हे काम माझे एकट्याचे नाही. हे आपले म्हणजे माझे व तुमचे दोघांचे आहे. तुम्ही माझे मालक आहात, मी तुमचा ताबेदार आह.

कॉन्ट्रॅक्टरने हे ऐकताच उभे राहून त्याला मिठी मारली व म्हणाला, सरदार, मी वीस वर्षे जोडे फाडून व मेहेनत करून जेवढे पैसे मिळविले तेवढे तुम्ही या कामांत दोन वर्षांत कमवून घेणार. सरदारने मालकाचा हात आपल्या हातात घेतला व म्हणाला, "मी जे काही मिळवीन ते सर्व आपल्या शुभहस्तानेच. ते सर्व माझे नाही. आपलेच आहे.

ही जी आलिशान राजवाड्याला लाजविणारी इमारत दिल्लीच्या मुख्य रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्याचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत आहे ती सरदार बहादुर वीर नरेंद्रसिंहाची आहे. सरदार आता म्हातारे झाले आहेत. व्यवसाय वाढला आहे. दोन-चारशे माणसे त्यांच्याकडे नेहमी येतजात असतात, दहावीस मोटारी नेहमी दारापुढे उभ्या असतात. त्यांच्या भाग्याला कारण झालेली मेमसाहेब आता विलायतेला गेली आहे आणि निश्चयपूर्वक त्याचा हात पकडून त्याला काम सांगणारे कॉन्ट्रॅक्टर साहेब परलोकी गेले आहेत. परंतु त्यांची मुले बाळे सर्व सरदार सांगतील त्याप्रमाणे कार्य करीत आहेत. सरदार त्यांची चांगली बडदास्त ठेवतात. त्यांनी स्वत: विवाह केला नाही. त्याबद्दल त्यांना कोणी विचारले तर जोराने हसून ते म्हणतात, "विवाह करण्याला फुरसदच मिळाली नाही. आता पुन्हा तरुण झालो तर पाहू एखादी मुलगी.

O

## ☐ आफ्रिकेत बहुपत्नी-विवाहाची आवश्यकता !

दहा बायका असलेल्या एका अफ्रिकन टोळी-प्रमुखाची कन्या आणि स्वातंत्र्य-पूर्व युगांडाची एकमेव स्त्री-मंत्री असलेली सौ. हॅना लुले यांनी थोड्या दिवसांपूर्वी भारत-भेटीत मागासलेल्या आफ्रिकन समाजाच्या समस्यांची कल्पना दिली. युगांडातील सामाजिक समस्या इतर मागासलेल्या देशांतील समस्यांसारख्याच आहेत. त्यातली मुख्य म्हणजे शहरांतील मौज-मजेला भुलून अधिकाधिक ग्रामीण लोक खेड्यांतून शहरांत जात आहेत. युगांडात फारच थोड्या शाळा आहेत, त्यामुळे शहरांत येणाऱ्या अशिक्षित तरुण मंडळींना वाईट वळण लागते. शहरांत नोकऱ्या मिळत नाहीत, त्यामुळे त्यांना रिकामा वेळ मिळतो. हा प्रश्न सोडवायला मदत करण्यासाठी स्त्री-कल्याण संस्था मुलींना स्वयंपाक, शिवणकाम, टायपिंग इत्यादी उपयुक्त व्यवसाय शिकवीत आहेत.

युगांडात अजून खूपच पडिक जमीन असून तेथे शेती करणे शक्य आहे. खेड्यांतून शहरांत आलेल्या लोकांना परत जायला प्रवृत्त करण्यासाठी सरकारचे प्रयत्न चालू आहेत व त्यांना यश येईल तेव्हा काही शहरी समस्या सुटू शकतील. युगांडातील पुरुष अजून स्त्रियांना सामाजिक समानतेचा सन्मान देत नाहीत ही मात्र खेदाची गोष्ट आहे. युगांडाच्या पार्लमेंटचे ९९ सभासद असून त्यात फक्त एक स्त्री आहे, आणि सबंध देशात फक्त चार स्त्री-डॉक्टर आहेत. बहुतेक मुला-मुलींची लग्ने आई-बाप जमवितात, पण स्वतःच्या पसंतीने लग्न करण्याची पद्धत शहरांत हळूहळू पसरत चालली आहे.

युगांडात स्त्रियांची संख्या फारच मोठी असल्याने तेथे बहुपत्नी-विवाह आवश्यक आहेत. शिवाय पुरुषांना आपली 'शांबा' (जमीन) खोदण्यासाठी व 'खश' (वेळू) उपटण्यासाठी बऱ्याच बायकांची जरुरी असते. युगांडात यापुढे एकपत्नी-विवाह प्रचलित होण्याची शक्यता आहे. पण तसे झाले तर बऱ्याच बायकांचे लग्न होणार नाही व त्या अनीतीच्या मार्गाला लागण्याचा व वेश्या-व्यवसाय काढण्याचा धोका आहे.

## ☐ अमेरिकन चित्रपट-सृष्टीतही 'स्टार सिस्टिम'

वॉर्नर ब्रदर्स या जगप्रसिद्ध अमेरिकन चित्रपट-कंपनीचे उपाध्यक्ष नॉर्मन काझ परवा दिल्लीला येऊन गेले तेव्हा त्यांनी अमेरिकेतील चित्रपट-सृष्टीवर ओझरता प्रकाश टाकला. पहिली गोष्ट म्हणजे चित्रपट-व्यवसाय उत्तरोत्तर प्रगती करणार यात संशय नाही; एके काळी टेलिव्हिजन हा चित्रपटांना फार मोठा प्रतिस्पर्धी

[पृष्ठ ६४ वर]

दिनानाथ कामत

# अश्रूंची कदर

कुडावयाच्या थंडीमध्येही आणि गाडीच्या बंद झरोक्यांच्या फटीमधून थेट कानांत शिरणाऱ्या चावऱ्या वाऱ्याची तमा न बाळगता मी वेगाने माझी फियाट पळवीत होतो. पन्नाशीच्या माझ्या वयोमानाला हे धाडसाचे होते. माझ्या शोफरला हे सांगूनही खरे वाटले नसते. माझ्या मोठ्या मुलीच्या–हेमाच्या–घरी जाण्याचा बेत बदलून मी माझ्या घराकडे इतक्या वेगाने निघण्याचे माझे वय नसले तरी डी कॉस्टाच्या लग्नाच्या पार्टीने मला हेमाकडच्या जेवणाचे आमंत्रण नाकारावे लागले व तिथल्या सामुदायिक डान्सेसच्या उन्मादक परिणामाने मला पंचविशीचे तारुण्य जाणवले. पार्टीचे फेणीचे व्हिस्कीमध्ये भेसळलेल्या अर्ध्या ग्लासाने मला तापवले होते. आणि जवळपासच्या एखाद्या मीनाक्षीचे आकर्षण वाटण्यापूर्वीच मी बाहेर पडलो. वृंदाची आठवण झाली ती डी कॉस्टाच्या पत्नीच्या दर्शनाने. त्याचे लग्न उशिरा होत असले तरी १५ वर्षांपूर्वी माझी पत्नी वृंदा हुबेहूब साकार व्हावी अशीच डी कॉस्टाची नववधू होती.

गाडी सुमनप्रासादाच्या आवारात उभी केली आणि वर गेलो. फ्लॅटच्या दारावरली बेल वाजवली. चावऱ्या वाऱ्याचा मारा चुकवत आत गेलो. समोर वृंदा उभी होती. ओठाला लिपस्टिक लावून सौम्य मेकअप्ने नटलेली वृंदा पाहण्यासाठी आसुसलेल्या डोळ्यांना बेकार सुटलेली आणि सुस्तावलेली ती प्रौढा पाहून थिजावट आली.




'हे काय! असं पाहता काय?' हे तिचे निर्जीव उद्गार विरस करून गेले. दिवाणखान्याच्या कोचावर बसलो. गात्रामधील धुंदी ओसरत होती. पण मन भरकटत होते. कपडे बदलण्याची सूचना करून ती आतील खोलीत गेलीसुद्धा. डोळे मिटून कोचाच्या मागील कठड्यावर डोके टेकले आणि किती वेळ विचारचक्र फिरत होते......

दुसऱ्या महायुद्धाच्या ठिणग्या पडत असताना वृंदाचा–माझा प्रेमविवाह झाला. ३९–४० सालच्या त्या काळात हिटलरने सगळ्या जगातल्या लोकशाहीला आव्हान दिलेले होते. पण राजकारणाशी माझे जमण्यासारखे नव्हते. देशातला तरुणवर्ग ४२ च्या वाऱ्याने ढवळून निघालेला आणि स्वातंत्र्य चळवळीत उभा ठाकलेला मी पाहिला होता. पण तसल्या त्या देशभक्तीच्या कल्पनांना माझ्या मनात जागा नव्हती. गरीब–मध्यम वर्गीयांतल्या एकत्र कुटुंब पद्धतीत मी जन्मलो व वाढलो; पण माझे स्वप्न होते चांगली पदवी, चांगली पत्नी, आपली गाडी, ऐश्वर्य आणि सुखलालसा. माझ्यासारख्या तरुणांना एकच आवाहन समजत होते. ऐश्वर्याची लालसा बाळगणाऱ्या तरुण पिढीने एकत्र कुटुंबपद्धतीला दिलेले आव्हान. आपण आपल्या पत्नीसह वेगळे राहूनच सुखी होऊ शकतो. वडिलांच्या कुटुंबाशी आपले कर्तव्य नाही. गेली अठ्ठावीस वर्षे आपण आपल्यापुरते पाहिले म्हणूनच सुखी राहिलो. स्वार्थापलीकडे परमार्थाच्या कोणत्याही कल्पना आपणाला परवडल्या नाहीत, पटल्या

नाहीत. वृंदासुद्धा आपल्याच स्वभावाची. काकणभर जास्तीच सुखलोलुप निघाली. पण आता तिच्यात वेगळे भाव दिसू लागले आहेत. मोठ्या मुलीचे,–हेमाचे लग्न–झाले. संजय आणि सुमन या आपल्या दोन मुलांच्या वागणुकीबद्दल तिला चिंता वाटते. आपण आपल्या वडिलांची, कुटुंबियांची पर्वा केली नाही. आपल्या मुलांनी तोच कित्ता गिरवला तर तिने दुःखी का व्हावे ! एकदम वृद्धावस्था आल्यासारखी ती बदलली आहे. तिच्या पाणावल्या डोळ्यांची मला पर्वा नाही. वडिलांच्या मृत्यू-नंतर माझी आई एकदा अशीच आली होती. 'माधव, मला थोडी मदत कर. धाकट्या श्यामलेचे–तुझ्या बहिणीचे–लग्न आहे. बाकीच्या तुझ्या भावांनी थोडीफार मदत केली आहे. तू समर्थ आहेस. हुंड्याची रक्कम जास्त नाही. ५००० हवेत. दिलेस तर मी तुला परत करीन. अलिबागच्या जमिनीची तेवढी किंमत नक्की येईल.'–आईला मी नकार दिला. तिच्या डोळ्यांत पाणी आले. समोर वृंदा बसली होती. तिच्याच डोळ्यांचे इशारे मी जुमानत होतो. माझ्या स्वार्थ-लंपट स्वभावाला आईचे पाणावलेले डोळे बदलू शकले नव्हते. ती गेली आणि वृंदा जवळ आली. म्हणाली, तुमच्या आईचे डोळे फार पाणीदार आहेत. त्यांना आपल्या इतर मुलांचा अभिमान फार. त्यांचा वाटा सांगून तुमच्याकडे पैसे मागायला धावल्या, दिले नाहीत हे बरेच झाले. आमचे पैसे द्यायला उद्या जमीन विकणार ती आजच विका म्हणावं. १० वर्षांपूर्वीचे आईच्या डोळ्यांतले पाणी आणि आताचे वृंदाच्या डोळ्यांतले पाणी ?

व्हिस्कीचा ग्लास संपला. तळाच्या फेसाकडे पाहात मी क्षणभर थांबलो. शरीरात पुन्हा वीज सळसळली. उन्मादकता वाढली. गाडीच्या चाव्या घेतल्या आणि तसाच निघालो. वृंदा अडवून म्हणाली, "हल्ली तुम्ही घरात ठरत नाही. रात्री उशिरा येता. आपल्या मुलांना तुमचे हे वर्तन प्रोत्साहन ठरते. त्यांना मी एकटी कशी आटो-क्यात ठेवू ?" मी म्हटले, ते दोघेही ग्रॅज्युएट आहेत. आपण शिक्षण दिले. त्यांना त्यांचे हित व सुख समजले पाहिजे. मला या विषयावर जास्त बोलायचे नव्हते. अलबेलात आज जंबोचा डान्स होता. मी फ्लॅटचे दार उघडून खाली आलो. गाडी बाहेर काढली. जंबोचे (मेरी अल्फान्सोचे टोपण नाव) कमनीय शरीर डोळ्यां-समोर उभे होते. गाडी कुलाब्याच्या दिशेने धावत होती. गेल्या शुक्रवारची ती रात्र. डान्स संपल्यावर फ्रामजीन अलबेलाच्या मॅनेजरने आपली जंबोशी ओळख करून दिली. एक मजेदार जोक केला त्याने तेव्हा ती एवढी हसली, एवढी हसली, की तिचा हात शेकहॅण्डमुळे माझ्याच हातात होता. हसता हसता तिच्या डोळ्यांवाटे पाणी आले. आपण आपले ओठ तिच्या डोळ्यांवर टेकवले. त्या उन्मादक अश्रूंचे आपण भोक्ते आहोत. अन्य अश्रूंची मला कदर नाही. का असावी ?

O



# आनंदी गोपाळ

श्री. ज. जोशी

**ही कादंबरी जशी आनंदीची आहे, गोपाळची आहे, तशीच आनंदी-गोपाळ या विलक्षण जोड-प्राण्याचीही आहे. तशीच त्या काळाचीही आहे..........**

इंग्रजांच्या राज्याबरोबर पारतंत्र्य आले खरे पण त्याहूनही एक मोठी अवघड, मुकाबला करायला त्रासदायक, भल्याभल्यांना हादरवणारी, विचार करायला लावणारी, नाकारता न येणारी आणि स्वीकारणाऱ्याला अत्यंत अडचणीत टाकणारी अशी एक गोष्ट आली. ती म्हणजे आपल्या सबंध समाजव्यवस्थेपुढे टाकलेला "का?" हा प्रश्न. हे व्रत का, हे वैकल्य का, ह्या जाती का, नहाण यायच्या आत लग्न का? नवरा गेल्यावर पुन्हा लग्न निषिद्ध का, न वदेत् यावनी वाणी का, मुंज का, लग्न का, हे का आणि ते का? ज्या गोष्टी शतकानुशतके अंधळेपणाने, पापाच्या, नरकाच्या, यमयातनांच्या, लोकापवादाच्या भीतीने स्वीकारल्या गेलेल्या होत्या, ज्यांच्याखेरीज दुसरा काही उत्तम जीवनाचा मार्ग असणे शक्यच नाही, असे मानले जात होते, त्यांच्यापुढे हा का? हा प्रश्न टाकला गेला आणि आपल्या समाजव्यवस्थेचा पायाच

उखडला गेला. अजूनही या का ?ला शांत करणारे उत्तर आपल्याला सापडलेले नाहीच अजूनही आपण चाचपडतोच आहो, किंवा ही नाती मित घट्ट पकडून बसलेले आहो.

ह्या ' का ?'चा दगड वसून आपला समाज भिरभिरू लागला, त्या काळातली ही आनंदी गोपाळ जोशींची गोष्ट. प्रचलित समाजव्यवस्थेचे गड्डे जे ब्राह्मण, त्यांचा प्रचंड पराजय झालेला, साऱ्याच ब्राह्मणांवरून नांगर फिरलेला, त्याचे वाडे जुनाट, निद्रिस्त झालेले, उपजीविकेचे साधन कुचकामी बनलेले आणि श्रद्धा, निष्ठा मात्र अजून जुन्याच राहिलेल्या, असा हा काळ होता.

आठ वर्षांच्या मुली तेव्हा मोठ्या होत, लुगडी नेसून कपाळभर कुंकवाचा टिळा लावत व शालीनपणे घराच्या कोपऱ्यात उभ्या राहात आणि त्यांची लग्नं झाली नाहीत तर त्यांच्या आईबापांना झोपा लागत नसत. कारण नहाण येण्याआधी जर मुलीचं लग्न झालं नाही तर लोक आईबापांना जाग्यावर ठेवत नसत. बायको नावाचा ' पदार्थ 'पणात यायच्या आधीच तिच्याशी संबंध करण्यापेक्षाही तिला लिहावाचायला शिकवणे, हे अधिक जाचाचे मानले जात होते. त्या जाचानं तीही झिजून झिजून मरत होती. मुलीच्या शिक्षणाला कुळवंतांच्या घराण्यात थारा नव्हता. एखाद्या घरातल्या मुलीला लिहितावाचता येते, ही गोष्ट त्या घराविरुद्ध बभ्रा होण्यास कारण ठरत होती.

## ' श्री. जं. ' चे यश

या काळात गोपाळ विनायक जोशी नावाचा एक अवलिया जन्माला आला ! पहिल्या बायकोला तर लिहायवाचायला शिकवून याने मारून टाकली आणि नंतर एक साधा पोस्टातला कारकून असून—रावसाहेब रावबहादुर नसूनही—त्यानं सुधारक व्हायची मनीषा धरली. मुलगी शिकायला तयार असली तर ' रांडेचं घराणं 'सुद्धा चालेल, असे दुसऱ्या लग्नाच्या वेळी स्पष्टपणे चारचौघांत याने बोलून दाखवले. विधवाविवाहासाठी—म्हणजे चक्क स्वत:चा एखाद्या विधवेशी विवाह व्हावा यासाठी—याने जंगजंग पछाडले, नाना लोकांचे पाय धरले. " पुण्यातील सुधारकांच्या दृष्टीने गरीब माणूस हा महारामांगांसारखा असतो, " अशी वाक्येही संतापून लिहिली. पण बिचाऱ्याचा विधवाविवाह झाला नाहीच किंवा झाला तो भलत्याच अर्थाने.

त्याच्यासाठी राखून ठेवली होती यमू. नऊ वर्षांची पण उफाड्याची, झोपाळ्यावर बसून मोठेमोठे झोके घेणारी, कडीपासच्या जागेसाठी भावाला ढकलून देणारी आणि हो—चोरून लिहायवाचायला शिकलेली. तिला आता केव्हाही नहाण आले असते आणि नहाण यायच्या आत तिचे लग्न झाले नसते तर चारचौघांत तोंड दाखवायला जागा उरली नसती.

एक वेळ हिला विहिरीत लोटा पण बायकोला लिहायवाचायला शिकवण्याचा आग्रह धरणाऱ्याला देऊ नका, हा सल्ला झुगारून नियतीने या यमूची आणि या

अवलियाची गाठ घातली. लग्नाचा पहिला मुहूर्त टाळून गोपाळरावांनी तिला विधवा बनवली आणि भटजींच्या गयावया ऐकल्यावर हृदय द्रवून त्यांनी असा 'विधवा-विवाह' केला.

ही जी काही चित्त थरारवून टाकणारी गाठ नियतीने बांधून टाकली, तिच्यातून जन्माला आली 'आनंदी गोपाळ' ही एक अत्यंत समर्थ कादंबरी. ती जशी आनंदीची आहे, गोपाळची आहे, तशीच आनंदी–गोपाळ या विलक्षण जोड प्राण्याचीही आहे. तशीच त्या काळाचीही आहे.

श्री. ज. जोशींनी ह्या चारी गोष्टींचे व्यवधान कुठेही सोडलेले नाही. अत्यंत धीम्या लयीत त्यांनी ही कादंबरी लिहिली आहे. त्या काळाचा भास निर्माण करून देण्यापुरते आवश्यक तपशील त्यांनी परिश्रमाने गोळा केलेले आहेत. त्यामुळे बारीक सारीक प्रसंग, थोडा वेळ येऊन गेलेली माणसेही सजीव झालेली आहेत. अगदी सुरुवातीलाच यमूचे लग्न होण्याआधीच तिला नहाण येते की काय, या काळजीत बुडालेले तिचे आईवडील, आजी, सोमणभटजी हे त्यांनी दाखवलेले आहेत. त्या काळाचा विचारप्रवाह त्यांनी या एका अर्थपूर्ण तपशीलाच्या पुनरुच्चाराने वाचकांच्या मनावर बिंबवला आहे. आनंदी–गोपाळांच्या झोपायच्या खोलीतले धान्यांचे डबे जसे त्यांना दिसलेत, तसे अलिबागेस ती दोघे फिरायला जात असताना लोकांनी त्यांच्या अंगावर कचरा ओतला असेल, हेही त्यांना जाणवलेले आहे. आनंदी सुरुवातीला ज्यावरून शिकली ते पुस्तक शंभर पानांचे, पिवळटसर होते आणि त्यातला पहिला धडा महाराणी अलेक्झांड्रा हा होता, हे त्यांनी शोधून काढलेले आहे. लोकमान्य टिळकांनी समास सोडून मोडीत पत्र लिहिले होते, हे ते ंगतात, तसेच "बाळशास्त्री माटे अंगानं आडवे, उंचीने खुजे व वाटोळचा चेहऱ्याचे होते. त्यांच्या पायांतला जोडा वाजत होता, कानांतली भिकबाळी हलत होती," असे चार वाक्यांत त्या काळच्या वैद्याचे समग्र दर्शन घडवतात.

मात्र या तपशिलाच्या भाराखाली काय सांगायचे ते दबून जाऊ नये, याचीही दक्षता श्री. ज. जोशींनी घेतली आहे. तपशील देतादेताच ते एकदम असे काही लिहून जातात की, तो सारा गद्य तपशील तर उजळून निघावाच पण त्या त्या प्रसंगांचे सारही निखळ स्वरूपात वाचकांपुढे उभे राहावे. उदाहरणार्थ, ही काही वाक्ये पाहावीत :–" शाळेला अचानक सुटी मिळावी तसे तिला झाले. ती आनंदली. पाय सरळ करीत ती म्हणाली, 'खरंच ?'"

"चिमुकल्या पाखराने निळया आकाशाकडे भेदरून पाहावे तसे ती त्या पुस्तकाकडे पाहात बसली."

'एकीकडे पूर्व होती ..दुसरीकडे पश्चिम ..दोन भिन्न संस्कृतींच्या फटीत आनंदी मात्र चेंगरली होती."

"तुळशीत पाणी ओतावे त्याप्रमाणे ताह्मणातले संध्येचे पाणी त्यांनी तिच्या मुखात घातले."

ही अर्थपूर्ण तपशील देण्याची आणि एखाद्या वेचक वाक्याने त्याला उजळून टाकण्याची किमया अमेरिकेतल्या वर्णनात मात्र कमी पडते असे सारखे वाटत राहते. अमेरिकेबाबतचे लेखकाने दिलेले तपशील ढोबळ आहेत, तेच तेच आहेत.

जसा तो काळ तशीच यमूची सौ. आनंदी आणि सौ. आनंदीची डॉ. सौ. आनंदी गोपाळ जोशी अशी झालेली प्रगतीही लेखकाने तन्मयतेने दाखवली आहे. नवव्या वर्षी लग्न झालेली, नाकात बोटे घालून शेंबूड काढणारी ही मुलगी नवऱ्याच्या धाकाने वाचू लागते, त्यात बुद्धीची गती चपल असल्याने चांगलीच उंच वाढते. अमेरिकेत गेल्यावर स्वदेशीच पिन पाठवा म्हणून नवऱ्याला लिहिते, आपले निशाण कोणते ? युनियन जॅक हे आपले निशाण नव्हे असे म्हणते, धर्म म्हणजे काय ?... ब्रह्म एकच आहे...हिंदूंचं ब्रह्म निराळं...मुसलमानांचं निराळं–ख्रिश्चनांचं आणखी वेगळं असं होत नाही. येथपर्यंत गहन विचार करू लागते. गोपाळरावांच्या खांद्याचा आधार घेऊन ती वर चढते व त्यांचे ठेंगणेपण ओळखू शकते. पण त्यांचे महत्त्वही जाणू शकते. काळाच्या फार पुढे आपला नवरा गेला म्हणून लोक त्याला क्षमा करू शकत नाहीत हे ती ओळखते. या इवल्याशा बीजाचा वेलू गगनावरी गेलेला आपण पाहतो आणि आनंदित होतो.

गोपाळराव ही या कादंबरीतली आनंदीइतकीच किंवा त्याहूनही अधिकच महत्त्वाची व्यक्तिरेखा. आनंदीची जशी आपल्या डोळ्यादेखत वाढ होते तशी याची होत नाही पण मुळातच हा माणूस अत्यंत गुंतागुंतीचा आहे. एकाच वेळी अत्यंत सुधारक, व्रात्य, कठोर, करुण, विशाल आणि संकुचित असा आहे. समाजाच्या विरुद्ध एकट्याने उभे राहण्याचे एवढे धाडस या माणसाच्या अंगात कुठून आले याचा शोध मात्र लेखकाने घेतलेला नाही ही एक मोठीच उणीव मला या व्यक्तिचित्रणाची वाटते. पण लेखकाने त्याला समाजसुधारकाच्या, स्त्री–कैवाऱ्याच्या चबुतऱ्यावरही नेऊन उभे केले नाही ही एक चांगली गोष्ट केली एरव्ही अत्यत तऱ्हेवाईक असलेला माणूस आपल्या बायकोला सर्वोच्च शिक्षण द्यायचं भव्य स्वप्न पाहतो आणि त्या स्वप्नासाठी स्वतःही राबतो आणि तिलाही निर्दयपणे राबवतो. बायको शिकली आणि परपुरुषाचा हात धरून गेली तर जबाबदारी गेली असे म्हणणारा हा अमेरिकेतून पाठविलेल्या तिच्या फोटोतला पदर किंचित ढळल्याचे पाहताच कुत्सितपणाचे काहूर उठवतो ! एकाच वेळी अत्यंत सामान्य किंवा सामान्याहूनही खालचा असलेला माणूस कुठेतरी अत्यंत असामान्य आहे. ही व्यक्तिरेखा तिच्या स्वभावातल्या सर्व गुंतागुंतींनिशी रंगविण्यात लेखक अत्यंत यशस्वी झालेला आहे.

या कादंबरीतला एक अत्यंत विलोभनीय भाग म्हणजे आनंदी आणि गोपाळराव यांच्या परस्पर संबंधांचा. शरीरसंबंध हे या संबंधाचे एक अंग–ती दोघे पतिपत्नी आहेत हे लक्षात घेता अतिशय महत्त्वाचे अंग. सुरवातीला कृतान्त वाटणाऱ्या या 'पुरुषा'बद्दलही कालांतराने आनंदीच्या मनात विश्रब्धतेची भावना डोकावू लागते,

तोवर शिक्षणाच्या कल्पनेने झपाटलेला हा पिसाट पुरुष आपल्या वैवाहिक जीवनातली ती बाजू बंदच करून टाकतो ! पुढे अमेरिकेत तिचे शिक्षण पुरे झाल्यावर, ती दोघे भेटणार एवढ्यात " मग साक्षात्कार झाला, मनात वीज चमकली–खोलीत फेऱ्या घालणाऱ्या, लहान चणीच्या, भगवी वस्त्रे घालणाऱ्या या पुरुषाबद्दल मन कधीच बहरलं नव्हतं, मनाला तसली पालवी कधी फुटलीच नाही–अंतर्यामाला तसा कधी फुलोरा आलाच नाही. " गोपाळरावाच्या बाजूने या विषम संबंधाबद्दल अतीव घृणा आहे (एवढी कोवळीक त्याच्या मनात कशी आली ?) स्वतःतल्या अनावर पुरुषाबद्दल संताप आहे. आणि कुठेतरी आपल्या सहचरीबद्दल कोवळीक आहे. (आनंदीच्या मृत्यूनंतर त्यांनी पुन्हा लग्न केले नाही ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.)

गुरु-शिष्यसंबंध हा त्या दोघांच्या संबंधांतला एक असामान्य पैलू. किंबहुना हा पैलू नसता तर हे जोडपे एवढे प्रसिद्धीस आलेही नसते. बायकोच्या शिक्षणाचीच फक्त अट घालणारा, तिला सरळ रेघ कशी काढावी इथपासून ते इंग्रजी, संस्कृत, भूगोल हे सर्व शिकवणारा, तिच्या शिक्षणासाठी तिला मारणारा, तिच्या नातेवाइकांशी हिरिरीने भांडणारा, शिक्षणासाठी मिशनऱ्यांशी मतलबी संधान साधणारा, तिला अमेरिकेला पाठवायचा धीट निर्णय घेणारा–अन् त्या कल्पनेनंच घाबरून जाणारा, नाना शंका घेणारा, कलकत्त्यातले तिचे इंग्रजीतले भाषण ऐकून तिच्यात अंबेचे दर्शन घेणारा असा हा गुरू ! आपल्या शिष्येशी अत्यंत मायेने कुत्सितपणे, कठोरपणाने, आदराने वागणारा हा गुरू ! आणि सुरुवातीला भीतीने, दडपून गेलेली पण पुढे ज्ञानार्जनाच्या प्रेमात पडलेली, गुरुच्याही वर पोहोचून त्याच्याकडे प्रेमाने, तिरस्काराने, आदराने, समजुतीने पाहणारी ही शिष्या !

आणि क्वचित या जोडप्यात असे सौहार्द निर्माण झालेले दिसते की जे केवळ बरोबरीच्या तरुणतरुणींतच सापडावे. तेही लेखकाने तन्मयतेने रंगवले आहे.

अशी ही महत्त्वाकांक्षी कादंबरी, ऐतिहासिक असूनही इतिहासाच्या तपशिलात हरवून न बसलेली आणि तरीही इतिहासाला धरून लिहिली गेलेली. त्या काळाचा आणि त्या काळात केवळ अद्वितीयपणे उगवलेल्या या जोडप्याच्या असामान्य मनाचा वेध घेणारी. विसाव्या शतकात लिहिली जाऊनही स्त्रीशिक्षणाच्या, समाजसुधारणांच्या सोप्या घोषणांना बळी न पडलेली, अत्यंत संयमाने तरीही, कणखरपणाने, जाणतेपणाने लिहिलेली.

अजूनही स्त्रियांच्या शिक्षणाला स्वायत्त महत्त्व आपल्या समाजात प्राप्त झालेले नाही. अशा परिस्थितीत हा एक सुरुवातीचा पराक्रम म्हणून सर्व भारतीयांच्या नजरेपुढे मांडला जावा. त्यासाठी त्याचे उरलेल्या सर्व भाषांतून भाषांतर होणे आवश्यक आहे !

**–सरिता पदकी**

**[ आनंदी गोपाळ : श्री. ज. जोशी : मॅजेस्टिक प्रकाशन : मूल्य पंधरा रुपये ]**

लेनिनच्या खुनाचा प्रयत्न होण्याची शक्यता आहे हे क्रपस्कायाला माहीत होते. त्यामुळे डॉक्टरांशिवाय लेनिनला कोणीही भेटता कामा नये अशी तिने व्यवस्था केली होती.

अर्थात स्टॅलिनला हा प्रकार मंजूर होणे शक्यच नव्हते. एके दिवशी स्टॅलिनने क्रपस्कायाला फोन केला. उर्मट आवाजात स्टॅलिन तिला म्हणाला, 'तुला राजकारणातलं काहीही कळत नसताना तू लेनिनला खोटयानाटया बातम्या पुरवीत आहेस. आम्हाला तुझं हे वर्तन बिलकुल मान्य नाही.'

स्टॅलिनची ती धमकी ऐकताच प्रारंभी क्रपस्काया काहीशी बावरली. स्टॅलिनला आपला अडथळा दूर करावयाचा आहे हे त्या चाणाक्ष स्त्रीने हेरले. परंतु ती सहजासहजी शरण जाणारी स्त्री नव्हती. स्टॅलिनला जुमानायचे असे तिने ठरविले. लेनिनची प्रकृती इतकी खालावली होती त्याला त्याबाबत काहीही सांगणे क्रपस्कायाला इष्ट वाटले नाही. तिने कामेनेव्हला पत्र लिहिले– 'स्टॅलिनने काल मला

# व्होल्गा जेव्हा लाल होते

## १४

वि. स. वाळिंबे

फोन करून अत्यंत उद्धट शब्दात माझी निर्भत्सना केली. मी काही आजच पक्षात प्रवेश केला आहे असे नव्हे. गेल्या तीस वर्षांत माझ्याशी इतक्या उर्मटपणे कोणीच बोलले नव्हते. लेनिनबद्दल आणि कम्युनिस्ट पक्षाबद्दल स्टॅलिनला जितकी आस्था आहे तितकीच मलाही आहे. लेनिनशी कोणत्या विषयाबद्दल चर्चा करावी आणि कोणते विषय त्याच्यापासून दूर ठेवावेत हे इतर कोणाहीपेक्षा मला अधिक चांगल्या रीतीने समजते. स्टॅलिनकडून माझ्या खाजगी जीवनात हस्तक्षेप होत असून तो थांबविण्यासाठी मी तुझ्या आणि झिनोव्हेव्हच्या सहाय्याची अपेक्षा करीत आहे. एक तर स्टॅलिनबरोबर भांडण्याइतकी माझ्यात ताकद नाही आणि तेवढा वेळही नाही. परंतु स्टॅलिनच्या वागण्यामुळे माझ्या मनाला खूप त्रास होत आहे.'

कामेनेव्ह काय किंवा झिनोव्हेव्ह काय, स्टॅलिनशी मुकाबला करण्याचे त्या दोघांत बिलकुल सामर्थ्य नव्हते. तरीदेखील धीर करून कामेनेव्हने स्टॅलिनला क्रपस्कायाच्या पत्राबद्दल विचारले. स्टॅलिन एवढा धूर्त होता की त्याने कामेनेव्ह

आणि झिनोव्हेव्ह या दोघांनाही आपल्या जाळ्यात ओढले. स्टॅलिन कामेनेव्हला म्हणाला, 'तू लेनिनची किंवा क्रुपस्कायाची इतकी पर्वा कशाला करतोस ? लेनिन काही आता फार दिवस जगत नाही. त्यानंतर आपण तिघे रशियाचे सूत्रधार होणार आहोत.'

स्टॅलिनकडून एवढे भरघोस आश्वासन मिळाल्यानंतर कामेनेव्ह आणि झिनोव्हेव्ह गप्प बसले.

क्रुपस्कायाने ट्रॉटस्कीला पत्र लिहुन हा प्रकार का कळविला नाही हे एक कोडेच आहे. कदाचित ट्रॉटस्कीपेक्षा कामेनेव्ह आणि झिनोव्हेव्ह यांच्या सामर्थ्यावर तिचा अधिक विश्वास असावा. मॉस्को सोव्हिएटवर कामेनेव्हचे व पेट्रोग्राड सोव्हिएटवर झिनोव्हेव्हचे नियंत्रण आहे हे तिला ठाऊक होते आणि म्हणूनच तिने या दोघांच्या मदतीची अपेक्षा केली असावी. परंतु पेट्रोग्राड आणि मॉस्को ही दोन शहरे सोडली तर रशियाच्या इतर भागावर स्टॅलिनचे नियंत्रण प्रस्थापित होत आहे त्याची क्रुपस्कायाला त्या वेळी कल्पना नव्हती.

## स्टॅलिनने एकच ध्यास घेतला होता—
## 'लेनिनचा पुनर्जन्म होता कामा नये.'

स्टॅलिन दिवसेंदिवस किती उर्मट होत चालला आहे हे लेनिनला क्रुपस्कायाकडून कळत होते. परंतु स्टॅलिनच्या वाढत्या सामर्थ्याला कसा आवर घालावा हे मात्र त्याला उमगत नव्हते. शेवटी ५ मार्च १९२३ रोजी लेनिनने स्टॅलिनला एक खरमरीत पत्र लिहिले आणि त्याच्या प्रती कामेनेव्ह आणि झिनोव्हेव्ह यांच्याकडे धाडून दिल्या. या पत्रात लेनिन म्हणतो—'तू माझ्या पत्नीशी टेलिफोनवरून उद्धटपणाने बोलून तिला गप्प बसण्याची धमकी दिलीस. माझ्याविरुद्ध सुरू झालेल्या तुझ्या कारवायांकडे दुर्लक्ष करणे मला शक्य नाही. माझ्या पत्नीचा अपमान हा मी माझा अपमान समजतो. म्हणून एक तर तू आपले शब्द मागे घेऊन पत्नीची क्षमा मागितली पाहिजे; नाही तर आपले उभयतांचे आतापर्यंतचे संबंध संपले असेच मी मानीन.

यात्र दिवशी लेनिनने ट्रॉटस्कीलाही एक पत्र लिहिले. त्यात तो म्हणतो. 'पक्षाच्या कार्यकारीणीमध्ये जॉर्जियन प्रकरणाची चर्चा होईल तेव्हा तू या प्रकर-

णातील माझ्या भूमिकेचा पाठपुरावा करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे. स्टॅलिन आणि झेर्झिन्स्की यांनी जॉर्जियन प्रकरणावावत जे वर्तन केले आहे त्याची कार्यकारिणीत शहानिशा झालेच पाहिजे. त्यांचे वर्तन योग्य नव्हते असे माझे मत आहे. मझी भूमिका तुला पटली तर मला आनंद होईल. तुला जर माझी भूमिका पटत नसेल तर तू त्या प्रकरणाचे सारे कागदपत्र माझ्याकडे परत पाठवून दे. तुझ्याकडून कागदपत्र आले की तुला माझी भूमिका मान्य नाही असे मी समजेन. '

मारिआ व्होलोडिचेव्हा हिला ही पत्रे सांगताना लेनिनला पंधरा मिनिटे लागली. परंतु तेवढेही श्रम त्याला सोसले नाहीत. त्याला लागलीच ताप भरला. त्याच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे या दोन्ही पत्रांच्या पाच टंकलिखित प्रती तयार करण्याचे त्याने मारिआला सांगितले. दोन्ही पत्रांची एकेक प्रत त्याने आपल्याजवळ ठेवून घेतली.

जॉर्जियन-प्रकरणाबाबत स्टॅलिनच्या विरुद्ध असलेल्या कार्यकारिणीच्या सदस्याना लिहिलेल्या त्रोटक पत्रात लेनिनने म्हटले होते – ' या प्रकरणी मी संपूर्णपणे तुमच्या पाठीशी उभा आहे. ओदोनिकिदचे पाशवी अत्याचार आणि त्याच्याशी स्टॅलिन आणि झेर्झिन्स्की यांनी केलेली हातमिळवणी यामुळे मी कमालीचा संतापलो आहे. कार्यकारिणीच्या बैठकीत तुम्ही काय सांगावे यासंबंधी मी सविस्तर टिपण तयार करीत आहे. '

६ मार्च रोजी लेनिनने हे पत्र मारिआ व्होलेडिचेव्हा हिला सांगितले. लेनिनचे हे शेवटचेच पत्र ठरले. तरीही स्टॅलिनविरुद्धची लढाई खेळण्याचा त्याचा निश्चय कायम होता. दुसऱ्या दिवशी म्हणजे ७ मार्चला लेनिनने फोटिएव्हा हिच्या करवी जॉर्जियन प्रकरणाचे सर्व कागदपत्र ट्रॉटस्कीकडे धाडून दिले. स्टॅलिनविरुद्धच्या लढाईत ट्रॉटस्की आपल्या मदतीला येईल अशी लेनिनची अपेक्षा होती. ट्रॉटस्कीशी बोलताना फोटिएव्हा म्हणाली, ' आगामी परिषदेत स्टॅलिनवर आग ओकण्यासाठी लेनिनने सर्व सिद्धता केली आहे. '

फोटिएव्हाचे हे उद्‌गार ऐकल्यानंतर परिस्थिति किती विकोपास गेली आहे याची ट्रॉटस्कीला पहिल्यांदा जाणीव झाली. आपण यासंबंधी कामेनेव्हशी चर्चा केली तर लेनिनला आवडेल काय असे त्याने फोटिएव्हा हिला विचारले. कारण लेनिनच्या गैरहजेरीत कार्यकारिणीचा हंगामी अध्यक्ष म्हणून कामेनेव्ह काम पाहत होता. त्यामुळे कामेनेव्ह हाच सर्वांत प्रमुख सूत्रधार आहे अशी त्याची कल्पना होती. ट्रॉटस्कीच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावे हे फोटिएव्हा हिला सुचेना. ती घाईघाईने लेनिनकडे आली आणि ट्रॉटस्कीचा प्रश्न त्याच्या कानावर घातला. लेनिन म्हणाला, ' हा प्रश्न एकट्या ट्रॉटस्कीनेच हाताळला पाहिजे. कारण ट्रॉटस्कीने जर का हे सारे कागदपत्र कामेनेव्हला दाखविले तर लागलीच तो स्टॅलिनला दाखविल्यावाचून

राहणार नाही. स्टॅलिनला जर या बेताचा सुगावा लागला तर तो सारा बनाव अशा रीतीने घडवून आणील की आपण निर्दोषी आहोत अशी सर्वांची खात्री पटावी. '

फोटिएव्हाने लेनिनचा हा निरोप ट्रॉटस्कीला सांगितल्यानंतर ते दोघे तासभर बोलत बसले होते. आपल्याला हे काम कितपत जमेल यासंबंधी तो साशंक होता. कारण स्टॅलिन आणि झोर्झिन्स्की यांना त्यांच्या अधिकारपदावरून बडतर्फ करावे असे त्याला मुळीच वाटत नव्हते. त्याचप्रमाणे ओर्दोनिकिद याला पक्षातून हाकलून देण्यासही त्याचा विरोध होता.

फोटिएव्हा म्हणाली, ' ओर्दोनिकिद याला पक्षातून किमान दोन वर्षे तरी बडतर्फ करावं अशी लेनिनची इच्छा आहे. '

ट्रॉटस्की उत्तरला, ' मला वाटतं तसं करणं चूक ठरेल. उलटपक्षी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये परस्पर–सहकार्याची भावना दृढ होईल यादृष्टीनं प्रयत्न करणं आवश्यकआहे ! '

लेनिनची अपेक्षा पुरी करण्यास ट्रॉटस्की असमर्थ आहे हे फोटिएव्हा हिला कळून चुकले. उद्विग्न मन:स्थितीत ती ट्रॉटस्कीच्या निवासस्थानमधून बाहेर पडली जाताना ती म्हणाली, ' लेनिनची प्रकृती तासातासाला ढासळत चालली आहे. डॉक्टर आपली समजूत घालत असले तरी त्यात काही अर्थ नाही. लेनिनला बोलायला खूपच प्रयास पडत आहेत. जॉर्जियन प्रकरणामुळे तो कमालीचा अस्वस्थ झाला आहे. त्याप्रकरणी नीट उपाययोजना व्हायच्या आत आपला मृत्यु होईल या काळजीने लेनिनला पछाडले आहे. तुला द्यायचे कागदपत्र माझ्याजवळ देताना तो मला म्हणाला होता, फोटिएव्हा फार उशीर करण्यात अर्थ नाही. योग्य वेळीच या प्रश्नाला तोंड फुटलं पाहिजे. '

'असं असेल तर मग मी यासंबंधी कामेनेव्हशी बोलली तर काय हरकत आहे ? ' ट्रॉटस्कीने विचारले.

' ठीक आहे. '

' तू लेनिनला भेटून तो काय म्हणतो ते मला सांगायला ये. '

तासाभराच्या आतच कामेनेव्ह ट्रॉटस्कीच्या भेटीला आला होता.

ट्रॉटस्कीकडे येण्यापूर्वी तो लेनिनच्या निवासस्थानी गेला होता. स्टॅलिनकडून क्षमायाचनेचे पत्र यायलाच हवे असे क्रुपस्कायाने बजावले असल्यामुळे कामेनेव्हला काहीही सुचत नव्हते. ' स्टॅलिनचा राजकीय नि:पात करण्याचा लेनिनचा निर्धार आहे ' हे क्रुपस्कायाचे वाक्य त्याच्या कानात घुमत होते. लेनिनची समजूत घालण्यासाठी तरी स्टॅलिनने क्षमायाचनेचे पत्र द्यावे असे कामेनेव्हला वाटू लागले होते. तरीही कामेनेव्ह आणि ट्रॉटस्की यांच्या भेटीत काही निर्णायक ठरू शकले नाही.

परंतु गमतीची गोष्ट अशी की कामेनेव्ह आणि ट्रॉटस्की यांची चर्चा सुरू असतानाच स्टॅलिन आपल्या खोलीत बसून क्रुपस्कायाची क्षमा मागणारे पत्र लिहित होता.

आणि इकडे लेनिनची प्रकृती झपाट्याने बिघडत चालली होती.

त्यानंतर अवघे दोन दिवस कसेबसे गेले. ९ मार्च १९२३ रोजी लेनिनला अर्धांगवायूचा तिसरा झटका अला.

स्टॅलिनबरोबरची त्याची लढाई आता आपोआपच संपुष्टत आली होती. कारण या तिसऱ्या झटक्यानंतर लेनिनची वाचाशक्ति कायमची नाहीशी झाली होती. त्याच्या शरीराची संपूर्ण उजवी बाजू लुळी पडली होती. डाव्या बाजूचे शरीरही कापत होते. यातच त्याचा ताप वाढला. १२ मार्च रोजी प्रसिद्ध करण्य.त आलेल्या पत्रकात एवढेच म्हटले होते की 'लेनिनची प्रकृती फारच खालावली असून त्याच्या उजव्या हाताची आणि पायाची हालचाल मंदावली आहे.'

डॉ. गुएटिएर म्हणाले, 'कालांतराने लेनिनची प्रकृती सुधारेल अशी माझी कल्पना आहे.' परंतु इतर डॉक्टरांना हा आशावाद खरा वाटत नव्हता. ते म्हणाले, 'लेनिन काही आठवड्यांचा किंवा जास्तीतजास्त दोन-चार महिन्यांचा सोबती आहे.'

डॉक्टरांचा हा अंदाज खोटा ठरला. अर्धांगवायूचा तिसरा झटका आल्यानंतरही लेनिन दहा महिने जिवंत होता.

११ मार्चला डॉ. रोझानोव्ह लेनिनला भेटावयास आले. लेनिन अद्यापही शुद्धीवर होता. भोवताली काय चालले आहे हे त्याला समजत होते. आपल्या डाव्या हाताने डॉक्टरांचा हात कुरवाळत लेनिन त्यांच्याकडे मोठ्या केविलवाण्या नजरेने पाहत होता. दुसऱ्याच्या दयेवर जगण्याची घोर शिक्षा मिळाल्यामुळे लेनिनचे मन आतून पेटून उठले होते. पण ती आग पेलण्याची त्याच्या डोळ्यात शक्ति उरलेली नव्हती. ओठांची दुबळी हालचाल करीत लेनिनने डॉक्टरांशी दोन-चार शब्द बोलण्याचा निष्फळ प्रयत्न केला. गालावर ओघळलेले अश्रू पुसत लेनिनने डोळे मिटून घेतले.

असेच आणखी काही दिवस गेले. गोर्की येथील आपल्या निवासस्थानी लेनिन अंथरुणाला खिळून होता. त्याला बोलता येत नव्हते, त्याचा उजवा हात थरथरत होता आणि तरीही रात्रभर डोळे सताड उघडे ठेवून भोवताली काय चालले आहे याचा वेध घेण्याचा तो प्रयत्न करीत होता. तिसरा झटका आल्यानंतर पहिले दोन महिने त्याची प्रकृती खरोखरच चिंताजनक होती. परंतु त्यानंतर त्याच्या आजाराला उतार पडला. जुलैच्या अखेरीस तर तो काठी घेऊन थोडेसे चालू लागला. रात्रीच्या वेळी त्याला निवांत झोप येऊ लागली. शरीर व्याधींनी पोखरून काढलेले असतानाही आपल्या मनोबलाच्या आधारावर लेनिन पुन्हा उभे राहण्याचा प्रयत्न करीत होता.

आणि आपली ही जिद्द त्याने खरी करून दाखविली. सप्टेंबरमध्ये तो जिना उतरून एकटा खाली आल्याचे पाहताच डॉक्टर आश्चर्यचकित झाले. लोकांचे बोलणे त्याला समजत होते, परंतु वाचाशक्ती गेली असल्यामुळे तो उत्तर देऊ शकत

नव्हता. लेनिनने अडखळत का होईना पण बोलले पाहिजे असे क्रपस्कायाला वाटे. त्यासाठी तिचे खूप प्रयत्न चालू होते. हातात काठी घेऊन उजवा पाय खरडत खरडत लेनिन चालू लागला तेव्हा क्रपस्कायाला हायसे वाटले. लेनिनला मोटारीतून बाहेर फिरावयास नेण्यात येत असे. उद्यानातील बाकावर बसून आकाशाकडे निवांतपणे पाहत बसून राहण्यात त्याचे तासचे तास चालू लागले. लेनिन स्वतः वृत्तपत्रे वाचू शकत असे. परंतु त्याने वाचनाचे कष्ट करू नयेत म्हणून क्रपस्काया वृत्तपत्रे वाचून दाखवीत असे. डाव्या हाताने लिहिण्याचा लेनिन सराव करीत होता. उजवे शरीर दुबळे पडले असले तरीदेखील आपले नित्याचे व्यवहार नीट करता यावेत यासाठी त्याची धडपड चालू होती.

लेनिनची प्रकृती हळूहळू सुधारत होती. ऑक्टोबरमध्ये काठीच्या मदतीने का होईना, पण त्याचे हिंडणे फिरणे सुरू झाले. तो आता दोन-चार शब्दही बोलू लागला होता. दोन-चार महिन्यांच्या आत लेनिनच्या प्रकृतीत एवढी सुधारणा होईल अशी डॉक्टरांनाही आशा नव्हती. सोपे शब्द वापरून लहानशी वाक्ये उच्चारायला येऊ लागताच लेनिनची खिन्नता बरीच दूर झाली. तरीदेखील खुणा करूनच त्याला आपले म्हणणे इतरांना समजावून द्यावे लागे. आपल्याला स्पष्ट बोलता यावे यासाठी लेनिनने इतके कष्ट घेण्यास सुरुवात केली की शेवटी त्याच्या बहिणीने डॉक्टरांना कळविले–' त्याला आता बोलायला बंदी केली नाही तर या श्रमांनी त्याचा विकार पुन्हा उचल खाईल.'

लेनिनने हवापालट करण्यासाठी क्रीमियात जावे असे डॉक्टरांनी सुचविले. परंतु मॉस्को सोडून बाहेर जावे असे लेनिनला वाटेना. राज्यकारभाराचे कागदपत्र पाहण्यासाठी आपण लवकर बरे झाले पाहिजे या एकाच विचाराने लेनिन औषधे घेत असे. झिनोव्हेव्ह गमतीने म्हणाला, ' लेनिनच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे याचे श्रेय त्याला स्वतःलाच आहे. कारण कोणती औषधे घ्यायची आणि कोणती घ्यायची नाहीत हे तो स्वतःच ठरवीत असतो.' लेनिन आपले ऐकणार नाही याची डॉक्टरांना जाणीव असल्यामुळे लेनिनने कोणती काळजी घ्यावी यासंबंधी ते क्रपस्कायाला सूचना देत व क्रपस्कायाच्या आग्रहाखातर लेनिन औषधे घेत असे.

ऑक्टोबरमध्ये मॉस्कोत एक कृषि-प्रदर्शन भरले होते. आपल्याला हे प्रदर्शन पाहयचे आहे असा लेनिनने हट्ट धरला. सध्याच्या परिस्थितीत लेनिनने हा ताण सहन करू नये म्हणून क्रपस्कायाने त्याची खूप समजूत घातली. परंतु त्याचा हेका कायमच होता. लेनिन म्हणाला, ' तुम्ही जर मला त्या प्रदर्शनाला नेणार नसाल तर मी स्वतःच जाईन हे लक्षात ठेवा. ' क्रपस्कायाचा निरुपाय झाला. या वेळी तो गोर्की येथे राहत होता. मोटार मॉस्कोत शिरताच लेनिनला इतका आनंद झाला की त्याने आपला डावा हात उंचावून जाणाऱ्यायेणाऱ्या नागरिकांना अभिवादन केले. लेनिन मॉस्कोत आला आहे ही बातमी शहरात पसरताच त्याच्या दर्शनासाठी

हजारो नागरिक रस्त्याच्या दोन्ही बाजूंना जमा होऊ लागले. अल्पावधीनच लेनिनच्या या प्रवासाला मिरवणुकीचे हे स्वरूप प्राप्त झाले.

कृषि-प्रदर्शन पाहून झाल्यानंतर क्रेमलिनमधल्या आपल्या निवासस्थानी आपल्याला घेऊन चलण्याचा त्याने ड्रायव्हरला इशारा केला. क्रेमलिनमधला सेवकवर्ग लेनिनच्या स्वागतासाठी प्रवेशद्वारापाशी हजर झाला होता. ती रात्र लेनिनने क्रेमलिनमध्ये व्यतीत केली. दुसऱ्या दिवशी सकाळी तो परिचारकांच्या मदतीने क्रेमलिनच्या हिरवळीवर हिंडत होता. क्रेमलिनमध्ये आल्यामुळे साहजिकच लेनिनला हुरूप आला होता. काठी टेकत टेकत तो आपल्या कचेरीत गेला आणि त्याने आपल्या मेजाचा खण उघडला. परंतु त्या खणातील आपले खाजगी कागदपत्र पळविण्यात आल्याचे पाहताच लेनिन खूप चडफडला. बोलता येत नसल्यामुळे खुणा करूनच हा खण कोणी उघडला याचीच तो चौकशी करू लागला. परंतु तेथे हजर असलेल्या सेवकांपैकी कोणालाच या चोरीची माहिती नव्हती. ही चोरी कोणी केली असली पाहिजे हे लेनिनला ठाऊक होते. परंतु अर्धे शरीर निकामी झालेला लेनिन आतल्या आत संताप गिळण्याव्यतिरिक्त काहीही करू शकत नव्हता. तो ड्रायव्हरला म्हणाला 'आताच्या आता आपण इथून बाहेर पडू. आपल्याला गोर्की इथ जायचंय.'

यानंतर लेनिन मॉस्कोला कधीही परतला नाही.

ऑक्टोबरच्या अखेरीस पिआटनिटस्की हा लेनिनचा जुना मित्र त्याला भेटावयास गेला होता. या भेटीनंतर पिऑटनिटस्कीने लिहिले आहे—'गेल्या वीस वर्षांत मी लेनिनला किती तरी वेळा भेटलो होतो. प्रकृती खालावली असल्यामुळे आता तो बराच खराब दिसत असेल अशी माझी कल्पना होती. परंतु पूर्वीइतक्याच उत्साहाने तो माझे बोलणे ऐकत आहे हे पाहून मला कमालीचे आश्चर्य वाटले. तोच उग्र चेहरा, तेच भेदक डोळे, चेहऱ्यावरचा तोच अस्वस्थ भाव आणि तेच मिस्किल हास्य. अर्धांगवायूच्या जबर आघातावर मात करण्याचा लेनिनचा प्रयत्न मला कौतुकास्पद वाटला. लेनिनला बोलता येत नाही, हे त्याच्या चेहऱ्यावरून मुळीच जाणवत नव्हते. शिवाय पूर्वीदेखील तो कमी बोलत असे. लोकांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकण्यातच त्याचा बराचसा वेळ जाई. आताही तो माझे बोलणे एकाग्र चित्ताने ऐकत होता. माझ्याबरोबर स्क्वोर्तसोव्ह आलेला होता. त्याने मॉस्को सोव्हिएटच्या निवडणुकीसंबंधी माहिती सांगावयास प्रारंभ केला. लेनिनचे त्याच्या बोलण्याकडे फारसे लक्ष नसावे असे मला वाटले. त्याची नजर मेजावरच्या पुस्तकांवरून हिंडत होती. मॉस्को सोव्हिएटने कोणकोणत्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत यासंबंधी स्क्वोर्तसोव्ह माहिती सांगत असताना लेनिन 'ठीक, ठीक' एवढेच म्हणत होता. परंतु हे शब्द उच्चारतानाही त्याला त्रास होत असावा असे त्याच्या चेहऱ्यावरून वाटे. शिवाय प्रत्येक वेळी आवाजात फरक पडलेला आढळे. मी जर्मन कामगारांच्या दुरवस्थेसंबंधी त्याच्याशी बोलत होतो. माझी माहिती अचूक आहे अशी त्याची खात्री झाली की त्याच्या

ओठांची उघडझाप होई आणि आम्हाला त्याचे शब्द ऐकू येत–' ठीक, ठीक ' ! आपण एका आजारी माणसाशी बोलत आहोत याचे आम्हाला भान राहू नये इतका लेनिनने या चर्चेत रस घेतला होता. जणू आपण लवकरच खडखडीत बरे होऊन देशाची सूत्रे हाती घणार आहोत असा त्याला जबर विश्वास वाटत असावा.'

लेनिनला जे प्रश्न विचारावेसे वाटत ते कृपस्काया विचारीत असे आणि पिआटनिटस्की किंवा स्क्वोर्तसोव्ह यांचे उत्तर ऐकल्यानंतर लेनिन 'ठीक, ठीक' एवढे शब्द उच्चारून आपली संमती व्यक्त करीत असे. शरीर साथ देत नसतानाही राजकीय घडामोडींमध्ये लेनिनचे बारिकसारीक लक्ष आहे हे पाहून पिआटनिटस्की आणि स्क्वोर्तसोव्ह हे दोघेही थक्क झाले. लेनिनच्या निवासस्थानातून बाहेर पडल्यानंतर पिआटनिटस्की स्क्वोर्तसोव्हला म्हणाला, ' लेनिन लवकरच कामकाज पाहू लागल असं मला वाटू लागलंय. '

' होय. पण त्यानं पूर्वीसारखं अहोरात्र काम करता कामा नये, ' स्क्वोर्तसोव्ह उत्तरला.

२ नोव्हेंबरला कामगारांचे शिष्टमंडळ लेनिनच्या भेटीला आले होते. लेनिनने आपल्या डाव्या हाताने सर्वांशी हस्तांदोलन केले. लेनिनची ती अवस्था पाहून सर्वांनाच भडभडून आले. कुझ्नेत्सोव्ह या कामगाराला तर आपल्या भावना आवरणे अशक्य झाले. लेनिनला मिठी मारीत तो म्हणाला, ' व्लादिमिर, मी एक साधासुधा कामगार आहे. पण तुझ्यासाठी काहीही करायची माझी तयारी आहे. '

इतर कामगारांनी मोठ्या प्रयासाने कुझ्नेत्सोव्हला शांत केले. लेनिनला फार काळ तिष्ठत ठेवणे बरे नव्हे या विचाराने कामगारांनी त्याला अभिवादन करून निरोप घेतला. हे कामगार बऱ्याच दूरच्या गावांहून आले होते. त्यामुळे रात्री त्यांनी गोर्की येथेच मुक्काम करावा असे लेनिनने आग्रहाने सुचविले. लेनिनचे हे अगत्य पाहून कामगारप्रतिनिधि अधिकच सद्‌गदित झाले.

नाताळानिमित्त कृपस्कायाने गोर्कीतील मुलांकरिता एक कार्यक्रम आयोजित केला होता. ' ख्रिसमस ट्री ' भोवती फेर धरून मुले नाचत असताना लेनिन तेथे आला. तावडतोब कृपस्कायाने मुलांना घरी जाण्यास सांगितले. परंतु लेनिनच त्या मेळाव्यात सहभागी झाल्यामुळे तिचा निरुपाय झाला. लेनिन किती तरी वेळ मुलांच्या सहवासात रमला होता. याच सुमारास झिनोव्हेव्ह, कामेनेव्ह आणि बुखारिन लेनिनला भेटण्यासाठी गोर्कीला आले होते. लेनिनने त्यांचे हस्तांदोलन करून स्वागत केले. परंतु लेनिनला बोलता येत नसल्यामुळे त्यांचा हिरमोड झाला. कृपस्काया त्यांना सांगू लागली, ' आता व्लादिमिरची प्रकृति ठीक आहे. मी त्याला वृत्तपत्रं वाचून दाखविते. प्रकृती सुधारत असल्यामुळे तो खूष आहे. दोनचार महिन्यांच्या आंत व्लादिमिर बोलू लागेल असा डॉक्टरांना विश्वास वाटत आहे. '

१९ जानेवारीला लेनिनने कृपस्कायाला जॅक लंडनची ' लव्ह ऑफ लाईफ ' ही

कथा वाचून दाखविण्यास सांगितले. मृत्यूची चाहूल लागलेल्या एका दुर्दैवी जिवाची ही कहाणी ऐकण्याचा लेनिनने का आग्रह धरावा याचा क्रपस्कायाला बोध झाला नाही. ' मी तुला दुसरी एखादी गोष्ट वाचून दाखविते ' असे क्रपस्कायाने म्हणताच लेनिनने खूण करून सांगितले, 'जॅक लंडन हा माझा आवडता लेखक आहे.' दुसऱ्या दिवशी त्याने क्रपस्कायाकडून जॅक लंडनची आणखी एक गोष्ट ऐकली. धन्याला दिलेला शब्द खरा करून दाखविण्यासाठी आपले प्राण गमावणाऱ्या एका कप्तानाची ही गोष्ट ऐकत असताना लेनिन खुषीत होता. त्याची खुषी पाहून क्रपस्काया सुखावली.

पण क्रपस्कायाचा हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. कारण दुसऱ्या दिवसापासून लेनिनची डोकेदुखी उफाळून आली. डोकेदुखीने तो इतका बेचैन झाला होता की त्याला सकाळची न्याहारीही करता आली नाही. आपले डोके खूप दुखू लागल्याचे त्याने संध्याकाळी क्रपस्कायाच्या कानावर घातले. तात्काळ क्रपस्कायाने डॉ. ऑरबाख यांना बोलावून घेतले. याशिवाय रोझानोव्ह, फोरस्टर, गुएटिएर, क्रेमर, ओसिपोव्ह आदि डॉक्टरही तेथे जमले होते. परंतु लेनिनने कोणालाही आत येऊ देण्यास नकार दिला. त्यामुळे त्याला काय होत आहे हे क्रपस्काया बाहेर येऊन डॉक्टरांना सांगे आणि ते आपापसात चर्चा करून क्रपस्कायाला औषध योजना समजावून सांगत असत. थोड्या वेळाने स्वतः लेनिन खोलीबाहेर आला आणि आपली प्रकृति ठीक असल्याचे त्याने डॉक्टरांना सांगितले. डॉ. ऑरबाख पुढे झाले आणि लेनिनचा हात हातात घेत म्हणाले, 'आता तुम्ही थकला असाल. भरपूर विश्रांती घ्या. नाही तर– '

लेनिन हंसला आणि डॉक्टरांचा निरोप घेऊन आपल्या खोलीत परतला.

मे महिन्यात भरणाऱ्या तेराव्या पक्ष-परिषदेचा कार्यक्रम निश्चित करण्यासाठी १६ जानेवारी रोजी मॉस्कोत पक्ष-कार्यकर्त्यांची बैठक भरली होती. या बैठकीला लेनिन आणि ट्रॉटस्की हे दोघेही हजर नव्हते. क्रांतीचे हे दोघे सूत्रधार प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे या बैठकीला येऊ शकले नाहीत आणि साहजिकच त्याचा परिणाम असा झाला की पक्षाचा सरचिटणीस या नात्याने स्टॅलिनकडे या बैठकीची सूत्रे आली. या बैठकीला झिनोव्हेव्ह, कामेनेव्ह, रिकोव्ह आदि नेते हजर होते. परंतु स्टॅलिनच्या वर्चस्वामुळे त्यांचे अस्तित्व फारसे जाणवले नाही.

आपण आणि सर्व सत्ताधीशपद यांमध्ये लेनिन आणि ट्रॉटस्की या दोनच व्यक्ती काय त्या उभ्या आहेत हे स्टॅलिनला पक्के ठाऊक होते. त्यापैकी लेनिनवर उघड हल्ला चढविणे त्याला सर्वस्वी अशक्य होते. म्हणून त्याने या बैठकीत एकट्या ट्रॉटस्कीवर कडक टीका केली. पक्ष–कार्यकर्त्यांच्या या बैठकीत स्टॅलिनच्या हस्तकांचाच प्रामुख्याने भरणा होता आणि त्यामुळे स्टॅलिनने जेव्हा ट्रॉटस्कीवर टीका करणे सुरू केले तेव्हा ट्रॉटस्कीची बाजू मांडायला एकही कार्यकर्ता उभा राहिला

नाही. स्टॅलिन म्हणाला, 'ट्रॉटस्कीने त्या काही वर्षांत सहा घोडचुका केल्या असून त्यांतील प्रत्येक चुकीबद्दल त्याला फाशी द्यायला हवे. पक्षाची शिस्तही तो नीट पाळत नाही, इतकेच नव्हे तर कार्यकारिणीपेक्षा स्वतःला तो शहाणा समजतो. थोडक्यात त्याने पक्षाशी द्रोह केलेला आहे.'

स्टॅलिन एवढे बोलूनच थांबला नाही. त्याने ट्रॉटस्कीविरुद्ध आणखी एक प्रभावी शस्त्र वापरण्याचे ठरविले. पक्षाच्या सर्वसाधारण सभेने कार्यकारिणीच्या एखाद्या सदस्याविरुद्ध दोन तृतीयांश मतांनी ठराव संमत केला तर त्या सदस्याला पक्षातून बडतर्फ करावे असा ठराव लेनिनने दहाव्या पक्ष-परिषदेत मंजूर करून घेतला होता. आतापर्यंत या ठरावाची कार्यवाही करण्यात आली नव्हती. ट्रॉटस्कीला नेस्तनाबूत करण्यासाठी स्टॅलिनने या ठरावाचा आधार घेण्याचे ठरविले. त्यासाठीच त्याने या बैठकीत ट्रॉटस्कीवरील आरोपांचा पाढा वाचून दाखविला. मेमध्ये पक्ष-परिषद भरताच ट्रॉटस्कीवर अविश्वास व्यक्त करणाऱ्या ठरावाचा बार भरण्यासाठी स्टॅलिनने सारी तयारी करून ठेवली.

१९२४ च्या जानेवारीमध्ये भरलेल्या या बैठकीने स्टॅलिनचा पुढचा मार्ग मोकळा केला होता. यापुढची तीस वर्षे सारा रशिया स्टॅलिनच्या एकतंत्री राजवटीखाली वावरणार होता. त्याचा पाया या बैठकीत घातला म्हणून या बैठकीचे महत्त्व विशेष मानण्यात येते. लेनिनला हे सारे कळत होते. हे घडू नये असे त्याला परापरीने वाटत होते. परंतु वाचाशक्ती हरपल्यामुळे त्याला आपले मनोगत व्यक्त करता येत नव्हते.

स्टॅलिनला ट्रॉटस्कीची मुळीच भीती वाटत नव्हती. आपण त्याला सहज चितपट करू शकू हे त्याला माहीत होते. त्याच्या मनाला फक्त एकच शंका भेडसावत होती. लेनिनची प्रकृती सुधारून तो पुन्हा क्रेमलिनमध्ये परतला तर मेमध्ये भरणाऱ्या पक्ष-परिषदेत आपल्याला ट्रॉटस्कीविरुद्ध आवाज उठवता येणार नाही याच एका काळजीने स्टॅलिन व्यग्र झाला होता. लेनिनची भेट घेऊन आलेल्या झिनोव्हेव्ह, कामेनेव्ह आणि बुखारिन यांनी स्टॅलिनला सांगितले होते-' लेनिनची प्रकृती लवकरच सुधारेल असे आम्हाला वाटते.' डॉक्टरही नेच सांगत होते-' येत्या उन्हाळ्यापर्यंत लेनिन बरा होऊन पुन्हा राज्यकारभाराची सूत्रे स्वतःकडे घेऊ शकेल असा आमचा विश्वास आहे.'

स्टॅलिन स्वतःशीच पुटपुटत होता, 'हे असे घडता कामा नये. लेनिनचा पुनर्जन्म होता कामा नये.'

या बाबतीत दैव आपल्याला अनुकूल आहे की नाही एवढेच आता स्टॅलिनला पाहायचे होते.

(क्रमशः)

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ शिवाजीमहाराजांना काँग्रॅच्युलेशन्स !

माय डियर शिवाजीमहाराज,

हार्टी काँग्रॅच्युलेशन्स ! एखाद्या मराठी वर्तमानपत्राची एअरमेल कॉपी स्वर्गात मिळत असेल तर तुम्हाला एव्हाना समजलं असेलच की भारताच्या सन्माननीय राष्ट्रीय नेत्यांच्या गव्हर्नमेंट-अॅप्रूव्हड् लिस्टमध्ये तुमचा नंबर लावायला मायबाप भारत सरकारने मान्यता दिली आहे असे महाराष्ट्र सरकारने नुकतेच जाहीर केले आहे. तुम्हाला हे अनएक्स्पेक्टेड प्रमोशन मिळाल्याची आनंददायक बातमी परवा वाचली तेव्हा मी अभिनंदनाची तार करणार होतो, पण पोस्टखात्याच्या कडक नियमानुसार तारेपेक्षा पत्र लवकर पोचते, म्हणून म्हटले पत्रच लिहावे.

पण काही म्हणा मिस्टर भोसले, आम्ही तुम्हाला महाराज, छत्रपती वगैरे वगैरे म्हणत असलो तरी त्यात विशेष दम नव्हता. कारण भारत सरकारकडून तुम्हाला आतापर्यंत साधी पद्मश्रीदेखील मिळवता आलेली नाही हे तुम्हाला कबूल करावे लागेल. स्पष्ट सांगायचे तर पद्मश्री नर्गिसदेखील तुमच्यापेक्षा ऑफिशियली अधिक श्रेष्ठ आहे. आता तुम्ही म्हणाल, माझे चरित्र लिहिले गेले आहे. कबूल,-पण अहो, चरित्र काय, हल्ली कोणाचेही असू शकते. चार कोटी रुपयांच्या आरोपावरून तुरुंगात गेलेल्या दालमियाचेही चरित्र लिहिलेले आहे-अन् कोणी सांगावे, पुढे मागे माझेही चरित्र लिहिले जाईल. तेव्हा माणूस खूप मोठा झाला की त्याचे चरित्र लिहिले जाते ही तुमची शिवकालीन कल्पना सोडून द्या. तुमच्या बाबतीत तर मी स्पष्ट म्हणेन की बाबासाहेब पुरंदऱ्यांनी लिहिलेले जाडजूड चरित्र वाचूनही तुमची महती पटली नव्हती ती आता या सरकारी सनदीमुळे पटली आहे.

त्यातूनही जरा बारकाईने विचार करायचा म्हणजे तुमच्या कोठल्या कार्यामुळे किंवा गुणांमुळे तुमच्यावर भारत सरकारची कृपादृष्टी झाली असावी बरे ? मला तर तुमच्यात एकही सरकारी सद्‌गुण दिसत नाही. तुम्ही मावळ्यांच्या वर्किंग कमिटीत सनदशीर स्वराज्याचा ठराव बहुमताने पास करून तो एक्स्प्रेस तारेने औरंगजेबाकडे पाठविला होता काय ? नाही. तुम्ही अफजुलखानाशी पंचशील करार केला होता काय ? नाही. शाहिस्तेखानाने तुमच्यावर अतिक्रमण केले तेव्हा तुम्ही एखाद्या तत्कालीन यूनोकडे फिर्याद गुदरली होती का ? नाही. जयसिंगाला अठ्ठावीस किल्ले

द्यावे लागले तेव्हा ते किल्ले नाही तरी मोडकळीलाच आले होते, म्हणून ते देण्यात विशेष नुकसान नाही असा बिनतोड युक्तिवाद तुम्ही केला होता काय ? नाही. अन् मुख्य म्हणजे तुम्ही हे हिंदुपदपादशाहीचे संकुचित कंत्राट उभे करण्याच्या ऐवजी मुस्लिमेतर डेमोक्रॅटिक फेडरल रिपब्लिक स्थापन केलेत का ? नाही. मग तुम्ही केलेत तरी काय ?

पण ती गोष्ट जमायला तेथे पाहिजे जातीचे, तुमच्यासारख्या येऱ्यागबाळ्याचे काम नोहे, तेव्हा तुम्हाला बेनिफिट ऑफ द डाउट देऊन मी असे धरून चालतो की तुमच्यात मला नाही तरी भारत सरकारला काही तरी दिसले असावे म्हणूनच तुम्हाला ही बढती मिळाली आहे. मग काय बरे असावी ती गोष्ट ?

मला वाटते एक म्हणजे तुम्ही जयसिंगाला लिहिलेल्या पत्रात "मुर्कोका जबाब तुर्कीमें" देण्याची भाषा केलीत त्यावरून तुमचा सेक्युलॅरिझम् सिद्ध होत असावा. नाही तर तुम्ही तुर्कीचा जबाब संस्कृतात देऊन मोकळे झाला असतात, नाही का ? दुसरे म्हणजे तुमच्या राज्यात स्नान–संध्या करायला का होईना, पण उदंड पाणी होते असा रिलायेबल रिपोर्ट आहे, त्यावरून तुमची वॉटर सप्लाय सिस्टिम एफिशीयंट होती व तुमचे प्रजाजन खाऊन नाही तरी पिऊन सुखी होते असे दिसते. तिसरे म्हणजे कात्रजच्या घाटात बैल पळवून तुम्ही मैदान मारलेत त्याअर्थी आजच्या-प्रमाणेच त्या काळात तुमचीही बैलांवर भिस्त होती असे सिद्ध होते. त्यातून हे बैल तुम्ही म्हणे जोडी–जोडीने पळवलेत म्हणज तुमच्या प्लॅनचे भवितव्य बैलांच्या जोडीवर अवलंबून होते. अर्थात एक सोडून दोन दोन बैलांवर अवलंबून राहणारा माणूस भारत सरकारला का प्रिय व्हावा हे सुज्ञास सांगणे नलगे. अन् माझ्या मते सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमचे औरंगजेबाशी भांडण झाले ते मुख्यत: तुम्हाला थर्ड रँक सरदारांच्या रांगेत उभे करण्यात आले म्हणून–म्हणजे एका अर्थी हा इंटर नॅशनल प्रेस्टीजचाच प्रश्न होता. नाही का ? तेव्हा आम्ही आधुनिक भारतीय पंडित नेहरूंच्या काळापासून इंटर्‌नॅशनल प्रेस्टीजवर जान कुर्बान करतो त्याचे महत्त्व तुम्हाला अंधुकसे तरी कळले होते असे आग्रा प्रकरणावरून दिसते.

ते काही का असेना, तुम्हाला कशीबशी मान्यता मिळाली आहे खरी, तेव्हा आता तरी तिला बट्टा लागेल असे वागू नका आणि ऑनर्स लिस्टमध्ये तुमचा नंबर लागला यात तुमचा नव्हे तर भारत सरकारचा मोठेपणा आहे हे विसरू नका.


हेची विज्ञापना
सिन्सीयर्‌ली युवर्स




## मुष्टियुद्ध आणि महाराष्ट्र

एकवीस ते चोवीस मार्चपर्यंत जमशेटपूर येथे राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धा भरल्या होत्या. तेथील व्यवस्था अतिशय उत्तम, मुष्टियुद्धाचे रिंगण मजबूत आणि सुशोभित होते. रोज चार–चार हजार प्रेक्षक येऊन लढती उत्साहानें पहात आणि कर्तृत्ववान खेळाडूंचे आस्थेवाईकपणे कौतुक करीत. या स्पर्धेत सेनादलाने विजेतेपद मिळविले. सेनादलाने ५० गुण मिळविले तर रेल्वे संघ उपविजेता ठरून त्यास फक्त १८ गुण लाभले. महाराष्ट्राची तर शोचनीय परिस्थिती झाली. केवळ ९ गुणांवरच महाराष्ट्राला समाधान मानावे लागले. आता पुढच्या वर्षी जबलपूर किंवा जमशेटपूर येथे अखिल भारतीय स्पर्धा भरविल्या जातील.

या मष्टियुद्ध स्पर्धेत पुण्याचे एकमेव खेळाडू टी. जे. नाईक यांनी महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधित्व केले होते. त्यांच्याबरोबर ए. इराणी व आर. पिटावाला, डी. पिटावाला आणि एम्. पिटावाला असे तीन बंधू होते. फ्लायवेट विभागात डी. पिटावाला उपान्त्य फेरीपर्यंत गेले. लाईट–फ्लायवेट विभागात नाईक यांचा तिसरा क्रमांक लागला. नाईक हे फार छोटेखानी मुष्टियुद्धपटू आहेत. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर ते तसे वाटणारही नाहीत. महाराष्ट्राची अशी पीछेहाट का, असे विचारता त्यांनी सांगितले की, "जमशेटपूरला ९ राज्यांतून १५० स्पर्धक आले होते. त्यांत वस्तुतः महाराष्ट्राचा दर्जा फार चांगला होता. शास्त्रशुद्धता, कस आणि दर्जात सेनादलापेक्षाही चांगली कामगिरी महाराष्ट्र बजावू शकला असता. पण हवा तेवढा सराव आम्हांस नियमित मिळू शकत नाही. सेनादलाचे खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेपूर्वी दोन–तीन महिने एकत्र येऊन मेहनतीने, जिद्दीने आणि शिस्तीने लढती देत असतात. त्यांना अन्नआहार नियमित आणि पद्धतशीर मिळतो. त्यांना शिकविण्यास उत्कृष्ट मल्लांची योजना केलेली असते. तसे महाराष्ट्राचे नाही. मुंबईला निदान 'वेस्टर्न इंडिया'सारखी अखिल भारतीय स्पर्धा तरी भरते. पुण्यात त्या मानाने मुष्टियुद्धाला काहीच प्रोत्साहन नाही. महाराष्ट्र राज्य खेळांना उत्तेजन देते. पण बॉक्सिगकडे दुर्लक्षच केलेले आढळते."



'बेस्ट बॉक्सर' नाईक

. टी. जे. नाईक शास्त्राचे पदवीधर असून कायद्याचे अभ्यासू आहेत. गेली दोन वर्षे त्यांनी पुणे विद्यापीठाचे प्रावीण्यपद मिळविले आहे. गेल्या वर्षी 'बेस्ट बॉक्सर' हा किताब त्यांना लाभला होता. वेस्टर्न इंडिया प्रावीण्य-स्पर्धेत ते उपविजेते ठरले होते. 'पुण्यात आर्मी स्कूल ऑफ फिजिकल ट्रेनिंग व फिशर स्कूलमध्ये बॉक्सिंगची दोन रिंगणे आहेत,' असे ते म्हणाले. 'पण इतरत्रही ती वाढली पाहिजेत. नाही तर शाळा–कॉलेजांतील गरीब विद्यार्थ्यांना त्याचा फायदा घेता येणार नाही. एका रिंगणाला १० ते १२ हजार रुपये खर्च येतो. ती बांधण्यासाठी उद्योगपती आणि सरकारला मुष्टियुद्ध संस्थेने विश्वासात घ्यावे,' असे ते म्हणाले.

"लठ्ठपणा किंवा वजनाने माणूस मुष्टियुद्धपटू होत नाही. दर्जेदार मल्लाला नजर आणि चपळाईवर अधिक अवलंबून राहावे लागते. हातपाय भक्कम असले की सडसडीत माणूससुद्धा या प्रांगणात उतरू शकतो. प्रतिस्पर्ध्याचे गुण–दोष हेरून व सर्व शक्ती हातावर एकवटून त्यास खेळावयाचे असते. सबंध शरीराची ताकद गुप्त रूपाने दोन्ही पंजात किंवा मुठीत सामावली की हाताच्या फटक्याचे परिणाम जबरदस्त होतात;" नाईक सांगत होते, "महाराष्ट्राला या क्षेत्रात पुष्कळच प्रावीण्य मिळविता येईल. पण शाळात या खेळांची भीती नाहीशी झाली पाहिजे. उत्तम क्रीडा शिक्षकांनी लहान मुलांना ताब्यात घेतले तर मुष्टियुद्धाचा प्रसार पुण्यात आणि महाराष्ट्रात इतरत्र जोरात होऊ शकेल."

नुकतीच पुण्यात दारासिंग आणि ऑस्ट्रेलियाचे बिग बिलवर्न यांची फ्री स्टाईल कुस्ती झाली. त्यास पंचवीस तीस हजार प्रेक्षकवर्ग होता. डेक्कन जिमखान्यावर नुकत्याच झालेल्या पै. चोरगे आणि पै. परदेशी यांच्या कुस्तीला पंधरा हजार कुस्ती शौकिन होते. म्हणजे सामर्थ्याच्या प्रदर्शनाचे कौतुक महाराष्ट्राला आहे. पुण्यात जास्तीत जास्त मुष्टियुद्ध स्पर्धा भरविल्या गेल्या तर या खेळाकडे बुद्धि-वादी वर्ग आणि सामान्य माणूस निश्चित आकर्षिला जाईल. तूर्त तीच आज गरज आहे असे वाटते.

---

## किमती क्रीडा–स्पर्धा

---

१९७० मध्ये आशियाई क्रीडा-स्पर्धा भारतात भरविण्यासाठी भारतामधील क्रीडा-संस्था आणि व्यक्तींनो सर्वतोपरी झटावे अशा अर्थाची सूचना लोकसभेचे प्रतिनिधी आणि अखिल भारतीय क्रीडा–महामंडळाचे एक सदस्य राम निवास मिर्धा यांनी केली आहे. दिल्ली ऑलिंपिक संस्थेने केलेल्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, "आर्थिक अडचण ही दुय्यम बाब आहे. देशामधल्या सर्व क्रीडा-संस्थांनी प्रामाणिकपणे सहकार्य केले तर या स्पर्धा यशस्वी होऊ शकतील. भारतीय ऑलिंपिक संस्थेला जर केंद्रीय शिक्षण खात्याने भरपूर मदत केली तर या स्पर्धा पूर्ण होण्याचे कार्य सुलभ होईल."

मिर्धा हे राजस्थान ॲथलेटिक संस्थेची गेली ९ वर्षे अध्यक्ष आहेत. ऑल इंडिया कौन्सिल ऑफ स्पोर्ट्सच्या, स्पोर्टस सेंटर कमिटी व नॅशनल स्टेडियमचे अध्यक्ष म्हणून नुकतीच त्यांची नियुक्ती झाली आहे. त्यामुळे त्यांच्या विचाराला एक निराळा अर्थ आहे आणि धारही आहे. केंद्रीय शिक्षण खाते आणि भारतीय ऑलिंपिक संस्था यांचे सूत आजपर्यंत कधीच जमले नाही. या शिक्षण खात्याची ऑल इंडिया कौन्सिल ऑफ स्पोर्ट्स ही संस्था सल्लागार या नात्याने काम पाहते. शिक्षण खात्याकडे त्यांनी केलेल्या शिफारशी मंजूर झाल्या तर त्या अर्थखात्याकडे जातात व तेथे क्रीडा-स्पर्धा, दौरे व इतर अनुदाने देण्याबाबत अंतिम निर्णय घेतला जातो. या तीन खात्यांत कधीच एकसूत्रता किंवा एकवाक्यता नसते. १९६६ च्या डिसेंबरमध्ये बँकॉकला गेलेल्या अखिल भारतीय क्रीडा-पथकाच्या वेळीं असाच घोळ या संस्थांनी घातला होता. एकाच्या मंजुरीला दुसऱ्याची मान्यता मिळेलच अशी खात्री नाही. वेस्ट इंडिज क्रिकेटचा दौराही परदेशी चलनाच्या चणचणीमुळे एक वर्ष पुढे ढकलला गेला होता. तेव्हा १९७० च्या आशियाई स्पर्धा भरविण्यापूर्वी केवळ प्रारंभशूरता न दाखविता सर्व बाजूंनी विचार करूनच निर्णय घणे योग्य ठरेल. पण

ह्या निर्णय त्वरित घेतला गेला पाहिजे. अर्थ आणि शिक्षणखात्यांनी नेहमीची दिरंगाई न दाखविता केवळ दोन वर्षांच्या कालात या स्पर्धा उभ्या करावयाच्या आहेत हे लक्षात घेऊनच आपली पावले उचलावीत.

दक्षिण कोरियाने ऐन वेळी माघार घेतल्यामुळे भारतीय ऑलिंपिक संस्थेने हा पुढाकार घेतला आहे. ही गोष्ट खरोखरीच कौतुकास्पद आहे. तरीपण आर्थिक बाब ही सर्वांत महत्त्वाची ठरेल. कार्याचे महत्त्व जरी मिर्वा अधिक जाणत असले तरी काय करणारी मंडळी आता जवळ जवळ संपुष्टातच येत चालली आहेत. निःस्वार्थी मदत आशियाई स्पर्धांसाठी मिळणे तूर्त तरी कठीण दिसते. याकरिता ज्यांच्याकडे पैसा आहे अशा उद्योगपती व श्रीमान व्यक्तींचाच आधार या निमित्ताने घेणे जास्त श्रेयस्कर ठरेल. नाहीतर आशियाई क्रीडा-स्पर्धा भरविण्याचा मान आम्ही आणि त्या अयशस्वी ठरल्याचे खापर मात्र आमच्याच डोक्यावर फुटणार आहे. म्हणूनच केंद्र सरकारच्या मूलभूत निर्णयाला मी अधिक किंमत देतो.

**–मनोहर रेगे**


काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

**डोंगरे**

# अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

**के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,**

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

**डोंगरे बालामृताचे**

# मॉंटीज डबल

अनुवाद : अनंत भावे

## ६


दुसऱ्या दिवशी सकाळी जॅक हेरवे व स्टीफन वॅट्स यांनी जेम्सला जेवायला नेले. रस्ते ओलांडताना ते जेम्सची विशेष काळजी घेत होते. न जाणो त्याला अपघात व्हायचा आणि रचलेला व्यूह ढासळून पडायचा. त्याच्या वृत्ती उल्हसित ठेवण्याचादेखील ते बुद्धिपुरस्सर प्रयत्न करीत होते. ती गोष्ट वाटते तितकी सोपी नव्हती; कारण मॉंटीच्या सवयी अंगवळणी पडाव्यात म्हणून जेम्सला मद्य घेता येत नव्हते की सिगारेट ओढता येत नव्हती.

जेवणानंतर तिघेही युद्धखात्यातील त्या तालीम-जागेत परतले. तेथे आणखी तीन माणसे उपस्थित होती. खोलीच्या एका बाजूला पडदा लावून आडोसा केलेला होता. तेथे जवळच एका स्टँडवर कॅमेरा उभा केला होता.

" ही आपली अखेरची तालीम आहे. " कर्नल लेस्टर म्हणाला, " खरं तर ही रंगीत तालीम आहे. त्या पडद्यामागं मॉंटीचा गणवेष ठेवला आहे. तू तयार झाल्यानंतर आम्ही तुझे थोडे फोटो काढणार आहोत. पंतप्रधान चर्चिलना पाहायचे आहेत ते ! "

जेम्स पडद्यामागे गेला. तेथे एक टेबल-खुर्ची होती. जवळच एक उंच आरसा होता. दुसऱ्या खुर्चीच्या पाठीवर मॉंटीचा युद्ध-गणवेष ठेवला होता.

खुर्चीत बसून जेम्सने आरशात पाहिले. आरशातील प्रतिबिंब त्याच्याकडे पाहात होते. त्या प्रतिबिंबाचे महापराक्रमी जनरल मॉंटगोमेरीशी जितके साम्य होते तितकेच एखाद्या भेदरलेल्या सशाशीही होते. नकळतच जेम्सला रंगभूमीवर प्रवेश करण्याची भीती वाटू लागली.



नॉर्थोल्ट विमानतळावर माँटी येणार म्हणून प्रचंड गर्दी जमली होती. बऱ्याच दिवसांनंतर माँटी लोकांसमोर येत होता. थोड्याच वेळात जेम्सची मोटार विमानतळावर पोहोचली आणि त्याची छाती धडधडू लागली. पगारखात्यात एक सामान्य कारकून असलेला जेम्स, हजारो लोकांचे दैवत असलेला माँटी म्हणून आज जगासमोर येत होता.

तो तशा मन:स्थितीत हताश होऊन थोडा वेळ बसला असेल इतक्यात नट म्हणून व्यावसायिक अहंकार त्याच्या मनात उफाळून आला. त्याने आरशातील प्रतिबिंब पुन्हा नीट न्याहाळले. माँटीच्या भूमिकेसाठी रंगभूषेची त्याला फारशी गरजच नव्हती. त्याने कानशिलाजवळचा भाग थोडा करडा केला, मिशी अगदी बारीक केली, भिवया ब्रश मारून थोड्या पिंजरल्या आणि हुद्देदर्शक फिती झळकत असलेला माँटीचा गणवेष चढवून त्यावर ती सोन्याची साखळी लटकावून दिली.

'रंगभूषा झाली की बाकीच्या गोष्टी आपोआपच येतात तुम्हाला' अशी रंगभूमीबाबत एक जुनी म्हण आहे, तिचा प्रत्यय जेम्सला आला. चिलखती तुकडीचे मानचिन्ह मिरविणारी काळी बेरेट डोक्यावर चढवून जेम्सने आरशात पाहिले, आणि त्याला पुन्हा आत्मविश्वास वाटू लागला. आपले हात माँटीच्या खास पद्धतीने मागे गुंफून त्याने दीर्घ श्वास घेतला आणि तो पडद्याबाहेर आला.

जेम्सइतकी कडक परीक्षा क्वचितच एखाद्या नटाची झाली असेल. आठ अत्यंत धूर्त आणि काकदृष्टीची माणसे त्याला बारकाईने निरखीत होती. एकेकाचे निरखणे झाल्यावर त्याच्या तोंडून समाधानाचा उद्गार उमटत होता. त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. समोरचा माणूस माँटी नाही, हे स्वत:ला पटवणे त्यांना कठीण जात होते. आपण जिंकली हे त्यांच्या आविर्भावावरून जेम्सच्या सहज लक्षात आले!

कर्नल लेस्टरने सुटकेचा नि:श्वास टाकला. छायाचित्रकाराने वेगवेगळ्या कोनांतून जेम्सची छायाचित्रे घेतली. त्यानंतर कर्नल लेस्टरने अखेरच्या सूचना द्यायला सुरुवात केली, "जिब्रॉल्टरचा मुक्काम संपल्यावर सरकारी भवनातून तुला विमानतळावर नेण्यात येईल. तुझ्याबरोबर सर राल्फ असतीलच. विमानतळावर नेहमीचाच सलामी देण्याचा वगैरे कार्यक्रम असेल. पण तेवढंच नाही. त्या वेळी तुला एक महत्त्वाची गोष्ट करावी लागेल."

"कोणती गोष्ट ?"

"जेम्स, या मोहिमेवर असताना तू तोंडाला कुलूप घातलं पाहिजेस असं मी तुला आतापर्यंत पुन: पुन्हा सांगितलं. पण या प्रसंगी विमानतळावर तू तोंड मोकाट सोडलं पाहिजेस. तू अगदी मनापासून बोलतो आहेस असं सर्वांना वाटलं पाहिजे. अर्थात प्रत्यक्ष बोलणं मात्र सारं कल्पनारम्यच असायला हवं. कारण असं की तोपर्यंत शत्रूच्या हस्तकांना माँटीच्या भेटीची वार्ता कळून ते तिथं जमलेले असतील. म्हणून मोटारीतून उतरल्यावर सर राल्फना तू एका बाजूला ने आणि महत्त्वाच्या सूचना देण्याचं नाटक कर. बोलताना मंत्रिमंडळाचा, गुप्त योजनांचा उल्लेख कर. बोलताना त्यात तू इतका गढून गेला आहेस की ते दुसऱ्या कोणाच्या कानावर पडेल याचं भानच तुला नाही असं वाटलं पाहिजे. आणि एक गोष्ट विसरू नकोस. सगळ्यांना तुला पाहू दे. बोलण्यात गढला आहेस असं दाखवून तू थोड्या फेऱ्या मार. बंदराच्या वेगवेगळ्या भागांचा हातानं निर्देश कर. त्यात काही बदल झाले आहेत असं सुचव. एकूण या बंदराकडे माँटी विशेष लक्ष देतो आहे, अशी सगळ्यांची समजूत झाली पाहिजे. कळलं ?"

"होय."

"जिब्रॉल्टरहून निघाल्यानंतर पुढं काय करायचं ते ब्रिगेडियर हेवुड सांगेल तुला. फक्त जिब्रॉल्टरलाच जायचं नाही, तर सगळ्या मध्य–पूर्वेत दौरा करायचा आहे."

जिब्रॉल्टरहून होणाऱ्या निर्गमनाची, लंडनच्या सूचनांबरहुकूम, तालीम घेण्यात आली आणि नंतर जेम्सने मॉंटीचा गणवेष उतरला.

संध्याकाळी पावणेसातच्या सुमारास जेम्स केनसिंग्टन येथील ब्रिगेडियर हेवुडच्या घरी पोहोचला. कर्नल लेस्टर आणि मूरही तेथे होतेच. सौ. हेवुडने त्यांना सँडविचेस आणि कॉफी दिली. जेम्सने मॉंटीचा गणवेष चढवला आणि खऱ्याखऱ्या शेवटच्या वार्तालापासाठी ते बसले.

## जनरलचा पगार

कर्नल लेस्टर म्हणाला, "जेम्स तू कच खाल्ली नाहीस तर सगळं व्यवस्थित पार पडेल. तुला काही अडचण पडली तर हेवुड आहेच मदतीला." मग काही आठवल्यासारखे दाखवून लेस्टर म्हणाला, "हां, आता तुझ्या पगारासंबंधी, खरं म्हणजे तुझ्या नेहमीच्या कामाचाच हा एक भाग मानला पाहिजे ! मात्र आम्ही युद्ध-मंत्रिमंडळाला सुचवलं होतं की या कामातला धोका लक्षात घेता त्याबद्दल काही जादा पगार–"

"धोका ? धोक्याबद्दल जादा पगार ?"

"होय जेम्स. या कामात धोका काही कमी नाही. असा धोका असलेल्या कामाचा जादा पगार देण्याची पद्धती आहे. पण तरीही अर्थखात्यानं जादा पगार देण्याचं नाकारलं. परंतु मॉंटीला हे कळल्यावर मात्र त्यानं वेगळाच आग्रह धरला. तो म्हणाला, 'माझा तोतया व्हायला जर जेम्स लायक असेल तर माझ्याइतका पगारसुद्धा त्याला मिळालाच पाहिजे !' "

दालव्हिनीमध्ये एका साध्या खोलीत मॉंटीशी झालेल्या त्या अविस्मरणीय मुलाखतीची आठवण जेम्सला झाली आणि नकळत त्याचे डोळे पाण्याने भरले.

"मी मॉंटीचा अत्यंत ऋणी आहे" जेम्स भारावून म्हणाला.

"सहज विचारतो," कर्नल लेस्टर म्हणाला, "मॉंटीला पगार किती मिळतो ?"

"किती मिळतो ?" जेम्सने उलट प्रश्न केला.

"किती मिळतो तो तुला ठाऊक असलं पाहिजे. पगारखात्यात काम करतोस ना तू !"

"खरं आहे. पण जनरलच्या पगाराचा हिशेब ठेवण्याचं काम मी कधीच केलेलं नाही."

जेम्सला वाटले कर्नल लेस्टरवर कामाचा फार ताण पडला आहे, स्वत: जेम्स थकला होताच. जनरलचा पगार माहीत नसलेला जेम्स अडाणी आहे असे लेस्टरला वाटत होते; तर जनरलचा पगार आपल्याला माहीत असला पाहिजे अशी अपेक्षा बाळगणारा कर्नल लेस्टर चक्रम आहे, असे जेम्सला वाटत होते. त्याच भावनेने ते परस्परांकडे पाहात होते. मात्र एवढ्या लहानशा कारणावरून हमरीतुमरीवर येणे वेडेपणाचे आहे, हे दोघांनाही थोड्याच वेळात उमगले.

## ते हातरुमाल

" जाऊ द्या. आत्ताच त्याच्याबद्दल भांडण कशाला ?" कर्नल लेस्टर म्हणाला, " आता शेवटची एक गोष्ट. हे दहाबारा हातरुमाल तुझ्याजवळ देऊन ठेवतो. त्यांच्या कोपऱ्यात मॉंटीच्या नावाची आद्याक्षरं भरली आहेत. विशिष्ट ठिकाणी, काळजी-पूर्वक हे हातरुमाल तू विसरून जा. यामागची युक्ती तुझ्या सहज लक्षात येईल. समजा, तू मॉंटी नाहीस असं एखाद्याला वाटलं असलं–त्याला जर यातला रुमाल मिळाला तर त्याला आपलं मत बदलावंसं वाटेल. नव्हे तो ते निश्चित बदलेल. असल्या लहान लहान गोष्टी फार महत्त्वाच्या आणि निर्णायक ठरतात कधी कधी."

कर्नल लेस्टरने 'शेवटची' गोष्ट सांगितली होती. आता फक्त निरोप घ्यायचा राहिला होता. सहजच जेम्सच्या अंतश्चक्षूंपुढे कर्नल लेस्टरच्या प्रथमभेटीपासून आत्तापर्यंतचा घटनापट उलगडला, त्या विलक्षण हिकमती माणसाबद्दल जेम्सला अत्यंत आदर वाटत होता. थोडक्या काळातच त्या दोघांचा सूर जमला होता. त्यामुळे एका मित्राचा वियोग होणार, असे जेम्सला वाटले.

" जेम्स, आता मी तुझा निरोप घेतो. कारण यानंतर तशी संधी मला बहुधा मिळायची नाही. या मोहिमेचा एकदा पडदा उघडला की तू कोणी क्लिफटन–जेम्स आहेस हे विसरून जा. ऑल द बेस्ट लक टु यू."

लेस्टरने जेम्सशी हस्तांदोलन केले आणि तो निघून गेला. एक प्रकारच्या चम-त्कारिक रितेपणाचा अनुभव जेम्सला येत होता.

तत्परतेने जेम्सने बॅरेट चढवली, घड्याळ मॉंटीसारखे मनगटाच्या आतल्या बाजूने बांधले, मधले नकली बोट सारखे केले. मॉंटीच्या पद्धतीने एक–दोन सलाम करून ते व्यवस्थित आहे, याची खात्री करून घेतली. मॉंटीप्रमाणे बायबलची एक प्रत सामानात ठेवली आणि नाटकाच्या पहिल्या प्रवेशासाठी तो सिद्ध झाला.

प्रवेशद्वाराशी जेम्स काही क्षण थबकला. रस्त्यावर तीन मोटारी उभ्या होत्या. त्यांपैकी मॉंटीचा ध्वज फडकत असलेल्या पहिल्या गाडीपासून थोड्याच अंतरावर दर्शनोत्सुक लोकांचा बराच मोठा जमाव जमला होता. जो प्रसंग, गेल्या काही दिव-सांत, जेम्सने असंख्य वेळा कल्पनत रंगवला होता तो अखेर प्रत्यक्षात आला होता.

जेम्स मोटारीपाशी जाताना जमाव त्याच्याकडे आदरान, कुतूहलाने पाहात होता. डायव्हरला प्रतिसलाम करून जेम्स मोटारीत बसला. लोकांनी प्रचंड जयजय-कार केला. अचानक उजव्या बाजूचे दार उघडून कर्नल लेस्टर आत डोकावला. म्हणाला, " ते तुझ्या नावानं जयजयकार करताहेत बघ. त्याचा स्वीकार कर. हात हालव. तू मॉंटी आहेस जेम्स !" आणि तो आला तसा निघूनही गेला. मोटार चालू झाली आणि लोक पुन्हा ओरडले. भूमिका वठवण्यात संपूर्ण गढून गेल्यामुळे प्रेक्षकांचा मघाशी जेम्सला विसर पडला होता. आता मात्र त्याने खिडकीतून बाहेर पाहिले. मॉंटीसारखे हास्य केले आणि मॉंटीसारखाच सलाम ठोकला. मॉंटीची

गाडी दिसताच सर्व दिशांनी लोक त्याला पाहायला येत होते.

मॉंटी नॉर्थोल्ट विमानतळावर जाणार असल्याची बातमी काळजीपूर्वक पसरवलेली असावी. कारण विमानतळापाशी बराच मोठा जनसमुदाय जमला होता.

विमानतळावरील देखावा अगदी तंतोतंत जेम्सने कल्पना केली होती तसाच होता. त्याच्या विमानाजवळ विमानदलातील माणसांची एक रांग उभी होती. डाव्या बाजूला पायदळातील आणि नौदलातील वरिष्ठ अधिकारी उभ होते.

जेम्सची छाती धडधडत होती. एक क्षणभर त्याला वाटले आपल्याला या मोटारीतून बाहेरच पडता येऊ नये आणि येथेच साऱ्या प्रकरणाची इतिश्री व्हावी. ही इच्छा आणि भीती लेफ्टनंट क्लिफ्टन–जेम्सची होती. आवेगाने त्याने या क्लिफ्टन-जेम्सला मागे ढकलले आणि तो मॉंटी झाला! त्या वेळेपासून पुढे ऐन मोहिमेपर्यंत त्याच्यामधील जेम्स हळूहळू मागे पडला. प्रसंगी त्याचे जेम्सपण फक्त त्याच्या स्मरणात शिल्लक होते. हा मानसिक चमत्कार त्याला साधला नसता तर सगळ्या मोहिमेवर पाणी पडले असते.

जेम्स मोटारीतून चपळाईने बाहेर पडला. वरिष्ठ अधिकाऱ्याने केलेल्या सलामाचा स्वीकार करून जेम्सने त्याला प्रतिसलाम केला आणि कवायतीची पाहणी केली. नंतर त्याने विमानाच्या कर्णधाराला काही जुजबी प्रश्न विचारले, विमानाच्या दारातून सगळ्यांना उद्देशून एक सलाम केला आणि विमानात पाऊल ठेवले.

नाटकाचा पहिला अंक निभावून नेल्यावर नटाला वाटतो तसा दिलासा जेम्सला वाटू लागला. आणि त्या पंतप्रधानांच्या विमानातील सुखसोईंनी तर त्याचे मन उल्हसित झाले. मॉंटीला अनेक वर्षे जवळून ओळखणारे वरिष्ठ अधिकारी कसे चकले, या विचाराने जेम्सला हसू फुटले. भोवतालचा विसर पडून तो हसलादेखील.

कोणीतरी त्याच्या खांद्यावर हात ठेवला तेव्हा तो भानावर आला. तो ब्रिगेडियर हेवुड होता. हेवुडने जेम्सला विचारले, "काय झालं?"

"कुठं काय? काही नाही."

"तुला बरं वाटत नाही का?"

"छे छे. उत्तम वाटतंय." असे म्हणून जेम्सने बेरेट काढली आणि पाय लांब केले.

"उत्तम वाटतंय असं म्हणालास तरी ते खरं नाही असं चेहेराच सांगतोय तुझा पण एक गोष्ट मात्र नक्की. तू आपली कामगिरी अगदी चोख बजावलीस......सिगारेटची तलफ आली आहे का?"

"तलफ?– व्याकुळ झालोय केव्हापासून. पण काय उपयोग?"

"पण आता ओढायला हरकत नाही. थोडी काळजी घेतली म्हणजे झालं."

"हेवुडने जेम्सला सिगारेट दिली. त्याने ती पेटविल्यानंतर थर्मासवरचा ग्लास काढून हेवुडने जेम्सच्या हातात दिला.

" मला नको कॉफी. मला छान वाटतंय. " जेम्स घाईघाईने म्हणाला.

हेवुड हसला. " ते माहीत आहे मला. ग्लास दिला तो सिगारेटची राख टाकण्यासाठी. जिब्रॉल्टरला जर कोणी विमानात सिगारेटची राख पडलेली पाहिली तर तू मॉंटी नाहीस असा संशय यायचा त्याला. "

" का ? ती राख तुझ्या सिगारेटचीसुद्धा असू शकेल. "

" माझ्या सिगारेटची ? आणि मॉंटीबरोबर असताना ? शक्य नाही ! "

लहानपणी चहाची पाने घालून तयार केलेल्या आणि चोरून प्यालेल्या सिगारेटींची आठवण जेम्सला झाली. त्यावरून आत्याचा चोपदेखील खाल्ला होता त्याने कित्येक वेळा. मॉंटीसुद्धा लहानपणी एकदा चोरून सिगारेट ओढताना पकडला गेला. त्या वेळी, धर्मगुरू असलेल्या त्याच्या वडिलांनी त्याला चर्चमध्ये नेले आणि मॉंटीने प्रभूसमोर पापाचा कबुलीजबाब देऊन माफी मागितली. मात्र त्या वयातही धूम्रपान वा मद्यपान न करण्याचे वचन त्याने दिले नाही; पण मोठा होऊन स्वतंत्र झाल्यावर मात्र त्याने आपण होऊन धूम्रपान–मद्यपान सोडून दिले होते.

## वाटेतील संकट

वेळ मजेत चालला होता. विमानाचा कर्णधार आला आणि जेम्स व हेवुडशी गप्पा मारीत बसला. आकाशात चंद्र झळकत होता आणि मोवतालचे पांढरेशुभ्र ढग त्याच्या प्रकाशात चमकत होते.

थोड्या वेळाने जेम्सने एक झोप काढली. तो जागा झाला तेव्हा पहाट फुटत होती. इतक्यात विमानाचा कर्णधार घाईघाईने आला आणि हेवुडच्या कानाशी लागून हलक्या आवाजात काही बोलू लागला. त्यांचे बोलणं जरी जेम्सला ऐकू आले नाही तरी त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेली चिंतेची गडद छाया मात्र त्याला सहज दिसली. काहीतरी घोटाळा झाला आहे, हे जेम्सने लगेच ओळखले. त्या घोटाळ्याचे खरे स्वरूप जेम्सला कित्येक महिन्यांनंतर उमगले.

एक भयप्रद संकट ओढवले होते. पेट्रोलच्या फेरभरणीमध्ये काही भानगड झाल्यामुळे किंवा कोणाच्या तरी कारवाईमुळे विमानात पेट्रोल अपुरे भरले गेले होते. जिब्रॉल्टरपर्यंत ते पुरेलच अशी शक्यता फार कमी होती. त्यांना दोनच मार्ग मोकळे होते. एक विमान समुद्रात उतरवायचे आणि बुडण्याचा धोका पत्करायचा किंवा अपरिहार्य झाले म्हणून स्पेनमध्ये उतरायचे आणि स्थानबद्धतेचा धोका पत्करायचा. प्रत्येक मार्गात धोका हा होताच. कोठला मार्ग पत्करायचा ?

ही परिस्थिती समजली तेव्हा प्रथम हेवुडला धक्काच बसला. पण अल्पावधीतच तो शांतपणे दोन्ही मार्गांवरील इष्टानिष्ट गोष्टींचा तुलनात्मक विचार करू लागला. कर्णधाराने सांगितली त्याच्यापेक्षा विमानाची परिस्थिती अधिक गंभीर आहे, हे त्याच्या लक्षात आले होते. समुद्रात उतरल्यास कोणी वाचण्याचा संभव मुळीच नव्हता आणि स्पेनमध्ये उतरावे तर जेम्स विलक्षण परिस्थितीत साप-

ण्याची शक्यता होती. त्याचे तोतयेपण लक्षात यते तर कदाचित स्पॅनिश अधिकाऱ्यांनी त्याला जर्मन गेस्टॅपोच्या स्वाधीन केले असते. किंवा अगदी एवढ्या थराला ते गेले नाहीत असे गृहीत घरले तरी जेम्सचे तोतयेपण उघड पडल्यामुळे योजनेमधील गुप्तताच संपुष्टात येणार होती. त्यामुळ बुडण्याचा धोका पत्करून समुद्रात उतरणेच अधिक श्रेयस्कर होते. दैव अनुकूल असेल तर वाचू, नाहीतर आपल्याबरोबर गुपितसुद्धा जलसमाधी घेईल असा विचार अखेर निश्चित करण्यात आला.

परंतु त्यांचे दैव भलतेच बलवत्तर होते. समुद्रात विमान उतरविण्याची पाळी त्यांच्यावर आली नाही. जिब्रॉल्टरच्या विमानतळावर विमान उतरविले तेव्हा टाकीत काही मिनिटांच्या उड्डाणासाठी लागेल एवढेच पेट्रोल उरले होते! जेम्सला अर्थात त्या वेळी या प्रसंगाची काहीच कल्पना नव्हती; आणि ब्रिगेडियर हेवुडचा खंबीरपणा इतका विलक्षण होता की घरी आरामखुर्चीत स्वस्थ पडावे तसा तो त्या विनाशक विमानात जेम्सच्या शेजारी आरामात बसला होता.

जेम्सने दाढी केली, स्नान उरकले आणि तो दुसऱ्या प्रवेशासाठी सिद्ध झाला.

इतक्यात हेवुडला अस्वस्थ करणारी आणखी एक गोष्ट घडली. विमानाच्या बाजूने चमत्कारिक आवाज येऊ लागले. जेम्सचा शागीर्द कॅप्टन मूर याला विमान लागले होते. अक्राळविक्राळ आवाज काढत तो ओकत होता. या विलक्षण प्रकारामुळे सगळ्या वातावरणालाच नकलीपणाची कळा आली. कारण शारीरिक तंदुरुस्तीच्या बाबतीत हेकेखोर असलेल्या माँटीने शागीर्दाचा असला कमकुवतपणा कधीही सहन केला नसता.

गोंधळात टाकणाऱ्या, आणीबाणीच्या प्रसंगी कर्नल लेस्टर कसा मार्ग काढतो हे जेम्सने पाहिलेले होते. हेवुडदेखील या बाबतीत लेस्टरला तोडीस तोड आहे हे लवकरच त्याच्या लक्षात आले. हेवुड म्हणाला, " बरं वाटेपर्यंत मूत्रीमधंच थांब तू असं सांगेन मी कॅप्टन मूरला. "

विकल झालेल्या कॅप्टन मूरला कसाबसा मुत्रीत ढकलला. मूत्री बाहेरून बंद करून घेतली. नेटका होईपर्यंत त्याला तेथेच डांबण्यात आले होते. ◻

पंतप्रधानांचे, ' माँटी ' जेम्सला घेऊन आलेले विमान जिब्रॉल्टरच्या विमानतळावर सुखरूप उतरले. ठरलेल्या वेळेपेक्षा अवघा दोन मिनिटे उशीर झाला होता. विमान थांबले आणि दुसऱ्या प्रवेशाचा पडदा उघडला.

पहिल्या प्रवेशात भूमिका उत्तम वठल्यामुळे जेम्सचा आत्मविश्वास द्विगुणित झाला असावा, असेच कोणालाही वाटले असते. पण ते खरे नव्हे. आत्मविश्वासापेक्षाही, अनेक वर्षांचा रंगभूमीवरील अनुभव आणि त्या व्यवसायातील हिकमती यांच्यामुळे तो स्वतःला सावरू शकला. त्यामुळेच या सर्व मोहिमेमध्ये एक क्षणभर-

देखील मॉंटीच्या भूमिकेवरील त्याची पकड ढिली झाली नाही. क्लिफ्टन-जेम्सचे अस्तित्व दडवून टाकून त्याने जणू जनरल मॉंटगोमेरीचे व्यक्तिमत्त्व धारण केले होते.

दुसऱ्या प्रवेशातील देखाव्याने जेम्सला रंगभूमीवरील नाट्य-प्रयोगाचीच आठवण झाली. पार्श्वभागी एखादा काळा पडदा असावा तसा जिब्रॉल्टरचा प्रचंड खडक होता. रंगभूमीवरील दुय्यम पात्रे नायकाच्या प्रवेशाची वाट पाहात होती. पाठीमागे पलटणी होत्या आणि डाव्या बाजूला तिन्ही दलांतील अधिकारी सलामीसाठी खडे होते. उजव्या बाजूला मॉंटीच्या मोटारींची रांग उभी होती. 'खलनायकी' प्रवृत्तीसुद्धा स्पॅनिश कामगारांच्या वेशात असलेल्या हिटलरच्या हस्तकांमध्ये साकार झाली होती !

वेगवेगळ्या भूमिकात रंगभूमीवर केलेल्या शेकडो रंगभूमी-प्रवेशांची आठवण जेम्सला झाली. त्या प्रत्येक वेळी त्याच्या मनात काहूर उठले होते. कधीकाळी आपल्याला रंगभूमीवर अशा प्रकारे प्रवेश करावा लागेल हे त्याच्या स्वप्नातही आले नव्हते. या प्रवेशातील अभिनयावरच अगणित देशबांधवांचे प्राण अवलंबून होते.

जेम्सला ब्रिगेडियर हेवुडचा आवाज ऐकू आला; "जास्तीत जास्त लोक तुला पाहतील असा प्रयत्न कर. कसली अडचण पडली तर मी जवळच आहे."

दरवाजा उघडला आणि जेम्स शिडीच्या वरच्या पायरीवर उभा राहिला. अधिकाऱ्यांनी सलाम ठोकला. त्यांना प्रतिसलाम करून शिडीवरून उतरून जेम्स अधिकाऱ्यांच्या रांगांकडे पाहणीसाठी वळला. स्मरणपूर्वक त्याने विचारले, "फोले इथं आहे काय ?"

"होय साहेब." असे म्हणून मेजर फोले पुढे आला आणि त्याने 'मॉंटी'ला सलाम ठोकला.

"ठीक आहे. आपण लगेच सरकारी भवनात जाऊ या." जेम्स म्हणाला.

हा सारा प्रसंग अगदीच मिळमिळीत होता, असे एखाद्याला वाटेल. पण जेम्सने मनात त्याची इतक्या वेळा तालीम केली होती की प्रत्यक्ष घडला तेव्हा त्याला तो प्रसंग खरोखरीचा न वाटता स्वप्नात घडावा तसा वाटला.

मेजर फोले आणि जेम्स एका मोटारीत बसले. ब्रिगेडियर हेवुड मागच्या मोटारीत बसला. मोटारी सरकारी भवनाच्या मार्गाला लागल्या. मेजर फोलेला सगळे कारस्थान माहीत होते. परंतु मोटारीचा ड्रायव्हर आणि त्याच्या शेजारी बसलेला संरक्षक दलातील अधिकारी हे अनभिज्ञच होते. त्यामुळे फोलेबरोबरच्या संभाषणातसुद्धा जेम्स प्रयत्नपूर्वक मॉंटीची भूमिका वठवीत होता. त्याचे बोलणे ऐकण्यासाठी ड्रायव्हरने आणि त्या अधिकाऱ्याने उत्सुकतेने कान टवकारले होते. पण 'मॉंटी' अगदीच मामुली गोष्टी बोलत होता !

स्पॅनिश नागरिकांचे थवेच्या थवे मॉंटीला पाहायला रस्त्यांवर लोटले होते. हिटलरचे हस्तकसुद्धा त्यांच्यांतच बेमालुमपणे मिसळलेले होते. जेम्सला वाटले हिटलरकडून बडे बक्षीस मिळण्याच्या आशेने एखादा गोळीसुद्धा घालायचा आपल्याला!

फोलेशी बोलताबोलताच जेम्स रस्त्यावरच्या लोकांना हात करीत होता. थोड्या वेळाने ते सरकारी भवनाशी पोहोचले. भवनाजवळसुद्धा लोकांचा समुदाय जमला होता. भवनाच्या प्रवेशद्वारात राज्यपाल सर राल्फ ईस्टवुड उभे होते. मोटारीतून उतरून, सलाम करून, जेम्स प्रवेशद्वाराशी पोचला.

हास्यवदन सर राल्फ हात पुढे करीत म्हणाले, " मॉंटी, तुला फारा दिवसांनी भेटल्यामुळं मला अत्यंत आनंद झाला आहे. "

" रस्टी, तू कसा आहेस ?" जेम्सने विचारले आणि " बरी दिसते आहे तब्बेत " असे उत्तरही स्वतःच देऊन टाकले.

एखाद्या जवळच्या मित्रासारखा जेम्सने सर राल्फचा हात हातात घेतला आणि ते दिवाणखान्यात गेले. तेथून सर राल्फनी जेम्सला आपल्या खोलीत नेले. दरवाजा काळजीपूर्वक बंद केला. न बोलताच त्यांनी हॅट काढून ठेवली आणि खुर्चीवर बसून ते जेम्सकडे एकटक पाहू लागले. काही क्षणांतच त्यांचा चेहरा हास्याने फुलला. एकदम खुर्चीवरून उठून ते जेम्सपाशी आले आणि आवेगाने हस्तांदोलन करीत म्हणाले, " माझा तर विश्वासच बसत नाही. मला वाटलं तू मॉंटीच आहेस. मॉंटीला आज मी इतकी वर्षं ओळखतोय; पण मलासुद्धा तू तोतया आहेस अशी शंका आली नाही. खरोखर तू इतका मॉंटीसारखा दिसतोस–बोलतोस की एकदा मला वाटलं की पूर्वीचा बेत बदलून खुद्द मॉंटीनं स्वतःच इथं यायचं ठरवलं की काय. खरं सांगायचं तर असा अभिनय मी पाहिलेलाच काही. कमाल आहे तुझी. "

सर राल्फ भारावून गेलेले उघड दिसत होते. जेम्सदेखील त्यांच्या स्तुतीने खुलला होता. सरसाहेबांनी जेम्सला सिगारेट देऊ केली. जेम्स ती नाकारीत म्हणाला, " सिगारेट प्यायला आवडलं असतं मला. पण मॉंटी पीत नाही ना सिगारेट. त्यामुळं मला सिगारेट ओढताना कोणी पाहिलं तर घोटाळा होईल सगळा. "

सर राल्फना आपली चूक उमगली. ते म्हणाले, " अरे बापरे, मी ते साफ विसरूनच गेलो होतो. पुन्हा माझ्या हातून अशी चूक घडली तर चांगल्या कानपिचक्या दे मला. "

सरकारी भवनामधील वास्तव्यात जेम्सची कशी व्यवस्था केली आहे याची कल्पना सर राल्फनी जेम्सला दिली. त्याला एक स्वतंत्र खोली देण्यात येणार होती. शत्रूच्या हस्तकांचा जिब्रॉल्टरमध्ये सुळसुळाट असल्यामुळे जेम्सला फारसे कोणी पाहणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक होते.

त्यानंतर मेजर फोलेबरोबर जेम्स आपल्या खोलीत आला. फोलेनेसुद्धा जेम्सच्या अद्भुत अभिनयाबद्दल कौतुकोद्गार काढले. जेम्सला न्याहारी करायला तेथे एकटाच सोडून फोले निघून गेला.

फोले गेल्यानंतर जेम्सने आरशात पाहिले. नकली बोट सारखे केले. आपण खरेच मॉंटीसारखे दिसतो, असे त्याला पटू लागले होते. खरे म्हणजे एकदा रंगमंचावर

प्रवेश केल्यानंतर त्याच्या मनातील हुरहूर शमली होती. आता तो आपल्या कामात रंगला होता.

एकदम त्याला आठवण झाली. न्याहारी घेऊन बहुधा तो इथे असलेला माँटीचा जुना शागीर्द येईल. लेस्टर म्हणाला होता की, या शागीर्दाला चकवणे जमले तर सर्वांना चकवणे जमेल.

दरवाजा वाजला आणि एक पांढऱ्या केसाचा नोकर आत आला. 'गुड मॉर्निंग सर' तो अदबीने म्हणाला. टबलाशी बसून काही महत्त्वाचे कागदपत्र वाचण्यात गढून गेल्यामुळे कोण आले ते आपल्या लक्षात आले नाही, असे जेम्स भासवीत होता. मनात अर्थात त्याच्याशी काय, कसे, किती बोलावे याचा विचार तो करीत होता. पण नोकराने तशी वेळच आणली नाही. न्याहारी टेबलावर ठेवून तो निघून गेला. त्यानंतर जेम्सला कळले की माँटीचा तो जुना आणि सच्चा शागीर्द त्याच्या भेटीकडे डोळे लावून बसला होता. त्याच्या अतिनिष्ठेमुळे आखलेल्या योजनेत कदाचित बिघाड होईल या कल्पनेने, जेम्सच्या जिब्रॉल्टरमधील वास्तव्याच्या काळात त्या शागीर्दाची दुसऱ्या ठिकाणी पाठवणी करण्यात आली होती.

न्याहारी संपली. जेम्स फोलेची वाट पाहू लागला. कितीतरी वेळ गेला पण फोले आला नाही. सरकारी भवनात सारे शांत शांत होते. माँटी झालेल्या जेम्सने भवनात स्वतः होऊन इकडे तिकडे हिंडणे शोभून दिसले नसते. कोणीतरी आल्याशिवाय गत्यंतर नव्हते, आणि कोणी येत नव्हते.

जेम्स कंटाळला. सहज खिडकीतून बाहेर पाहू लागला. खाली एक चौक दिसत होता. एक-दोन टॅक्सीज उभ्या होत्या. माणसांची थोडीशी वर्दळ होती. या दृश्यावरून नजर फिरवीत असताना अचानक जेम्सचे लक्ष समांतर रेषेत, जवळच एका इमारतीच्या छपरावर चाललेल्या कसल्यातरी हालचालीने वेधले गेले. जेम्सने अधिक बारकाईने पाहिले. कोणीतरी माणूस त्या शेजारच्या बिल्डिंगच्या छपरावर उभा होता. त्याच्या हातात बंदुकीसारखे काहीतरी होते आणि ते त्याने जेम्सवरच रोखले होते !

त्या खोलीला दोन मोठ्या खिडक्या होत्या. आणि दोन खिडक्यांच्या मधल्या जागी, त्यांच्यापासून थोडा दूर, जेम्स उभा होता. त्यामुळे त्या छपरावरल्या माणसाने जेम्सला पाहिले असेलच अशी खात्री नव्हती. तरीही जेम्सला वाटले, शक्य तितक्या त्वरेने आपण खोलीबाहेर निघून जावे. पण लगेच आपण कोणाची भूमिका करीत आहोत हे त्याच्या लक्षात आले. खरा माँटी असा वागला नसता, आयुष्यात माँटीला कसल्याही गोष्टीचे भय वाटले नव्हते; त्यामुळे आपल्यालाही तसाच 'अभिनय'करणे भाग आहे !

यापेक्षा अधिक शहाणपणाची गोष्ट म्हणजे घंटी वाजवणे आणि कोणाला तरी बोलावणे. पण घंटी वाजवण्यासाठी हलणे भाग पडले असते; आणि हालचालीमुळे

गोळीबार ओढवण्याची शक्यता होती. पण त्याला इलाज नव्हता. सावधपणे जेम्स पलीकडे गेला. काही झाले नाही. मग त्याच्या मनात आले, उगाच घाबरलो आपण. उगाच बाऊ केला साध्या प्रकाराचा. पण लगेच, या मोहिमेतील धोका लक्षात घेता जेम्सला जादा पगार देण्यात यावा अशी जी शिफारस कर्नल लेस्टरने युद्ध-मंत्रि-मंडळाला केली होती तिचे स्मरण जेम्सला झाले. जेम्सच्या कामात धोका निश्चि-तच होता. इतकेच नव्हे तर त्या क्षणापुरते जेम्सच्या मनात आले की गुप्तहेर खात्याला आपला खून व्हावा असेदेखील वाटत असेल कदाचित! कारण मॉंटीचा काटा काढला गेला आहे अशी जर्मनांची खोटी समजूत होणे दोस्तांच्या दृष्टीने केवढे तरी फायद्याचे ठरले असते.

अशा विचारात असताना पुन्हा एकदा जेम्सने त्या छपराकडे नीट निरखून पाहिले. तो माणूस, तशा अवस्थेत, अजून तेथेच उभा होता. भुईसपाट झाल्या-शिवाय त्याला चुकविणे कठीण आहे, असे जेम्सला वाटले. पण आपण भुईसपाट असताना मेजर फोले किंवा दुसरे कोणी आत आले तर? त्याने पुन्हा त्या छप-राच्या दिशेने पाहिले आणि त्याच्या एकदम लक्षात आले की आपली भीती अग-दीच वेडगळपणाची होती. बंदूक होती कोठे त्या छपरावरच्या मनुष्याच्या हातात? त्याच्या हातात होती एक लांबलचक, बंदुकीसारखी दिसणारी दुर्बीण! तो त्या दुर्बिणीतून 'मॉंटी'चे निरीक्षण करीत होता! आणि मॉंटीसाहेबांना वाटले होते त्याने बंदूकच रोखली आहे आपल्यावर.

तेवढ्यात मेजर फोले आला आणि लगेच ते दोघे राज्यपालांच्या खोलीत गेले. सर राल्फनी तावडतोब पुढील पवित्रे स्पष्ट करावयास सुरुवात केली. ते म्हणाले, "दहा मिनिटांनी आपण दोघे बागेत चक्कर टाकायला जाऊ. जवळच तुला भव-नाच्या एका भागाचं बांधकाम चाललेलं दिसेल. त्या कामावर अर्थातच इथले काम-गार आहेत"–मध्येच थांबून त्यांनी खिडकीतून डोकावून इकडे तिकडे पाहिले आणि ते पुन्हा म्हणाले, "त्या कामगारातला एक शत्रूचा हस्तक आहे."

"मला कल्पना आहे त्याची."

"तुला कल्पना आहे? म्हणजे?"

"मघाशी दुर्बीण रोखून पाहात होता ना तो माझ्याकडं."

"काय सांगतोस?...पण एका परीनं ते ठीकच झालं. हेच तर व्हायला पाहिजे आहे आपल्याला. तू खरोखरच जनरल मॉंटगोमेरी आहेस की नाही याची खात्री करून घेत असणार तो...आणखी एक गोष्ट आमच्या माहितीचे दोन स्पॅनिश उद्योगपती आहेत. खरे शत्रूचे हस्तकच आहेत ते; पण उद्योगपती म्हणून वावरतात हे महाशय. ते आता भेटायला येतील आम्हाला. आमच्याकडचे मोरोक्कोचे काही गालिचे पाहायचे आहेत त्यांना. बागेतून घराकडे येताना वाटेत बागेतच त्यांची ओळख करून देतो तुला."

सर राल्फनी घड्याळाकडे पाहिले आणि ते घाईघाईने म्हणाले, "बागेत एक पाण्याची टाकी आहे. त्या टाकीबद्दल मी बोलणं सुरू केलं की, ते दोघे येताहेत असं समजायचं. ही भेट अकस्मात, योगायोगानं झाली, असं वाटलं पाहिजे. शत्रूच्या दृष्टीनं माँटीशी भेट ही मोठी भाग्याची गोष्ट आहे....चल. जायची वेळ झालीच आहे."

दाराजवळ जाताना सर राल्फ खुषीत येऊन म्हणाले, "बाकी या नाटकाची मला मोठी गंमत वाटते आहे. किती दिवसांत अशी गंमत केली नव्हती. एकाच गोष्टीची मला चिंता वाटते. माझा अभिनय तुझ्या तोडीस तोड कसा होणार ?"

"हा विनय आहे तुमचा. नाटकात असता तर नटवर्य झाला असता तुम्ही." जेम्स प्रामाणिकपणे म्हणाला.

आकाश निरभ्र होते. स्वच्छ ऊन पडले होते. सर राल्फ आणि जेम्स बागेत फेरफटका करीत होते. बागेचा षौक असल्यामुळे सर राल्फनी बाग मोठी देखणी ठेवली होती. फुलांची माहितीसुद्धा त्यांना चांगलीच होती. जेम्सला बिचाऱ्याला त्या विषयात काहीच गम्य नव्हते. त्यामुळे त्याने जिज्ञासू पृच्छकाची भूमिका घेतली होती.

बांधकामापाशी आल्यावर जेम्स मुद्दामच जरा वरच्या सुरात बोलू लागला. दुर्बीणवाला तो माणूस त्याने बरोबर ओळखला. पण आता त्याच्याजवळ दुर्बीण नव्हती. अजूनही तो जेम्सकडे रोखून पाहात होता. मात्र जेम्सने त्याच्याकडे पाहताच त्याने नजर फिरविली.

अचानक सर राल्फ पाण्याच्या टाकीविषयी बोलू लागले. दूरवर बागेचा लोखंडी दरवाजा करकरल्याचा आवाज जेम्सने ऐकला. दोन माणसे त्यांच्या दिशेने येत होती. तिशी उलटलेली, अत्यंत रुबाबदार पोशाख केलेली ती माणसे चेहऱ्यावरून मोठी धूर्त दिसत होती.

त्यांच्याकडे आपले लक्षच नाही, असे भासवीत जेम्सने पाण्याच्या टाकीबद्दल बोलणे चालूच ठेवले. ती माणसे जवळ आली तेव्हा सर राल्फ जेम्सच्या कानात कुजबुजले, "नर्व्हस होऊ नकोस जेम्स. प्रसंग चमत्कारिक आहे. डोकं शांत ठेव."

जेम्सने पाण्याच्या टाकीचा विषय बंद केला. आता तो युद्ध–मंत्रिमंडळ आणि तीनशे तीन क्रमांकाची (कल्पित) योजना यांच्याविषयी मोठ्या उत्साहाने बोलू लागला. सर राल्फनी त्याच्या हाताला सूचक स्पर्श केला. जेम्सने बोलणे अचानक थांबवले आणि त्या स्पॅनिश उद्योगपतींच्या आकस्मिक आगमनाबद्दल आश्चर्य दर्शविले.

सर राल्फनी त्यांची 'जनरल माँटगोमेरी'शी ओळख करून दिली. आश्चर्य आणि आदरभावनेने त्यांचे चेहरे उजळून निघाले. जेम्स त्यांच्याशी तत्परतेने बोलत होता; पण त्याने आपल्या दर्जाचा विसर पडू दिला नव्हता. बोलताना कायम हात

मागे गुंफलेले होते. आणि मॉंटीच्या या सवयीबद्दल जेम्सने त्याला मनोमन शतशः धन्यवाद दिले. कारण त्यामुळे त्याचे नकली बोट त्याला मुद्दाम लपवावे लागत नव्हते !

त्यांच्यापैकी एक एखाद्या सनसनाटी गुप्तहेरकथेतील कावेबाज हेरासारखा दिसत होता. त्याने आपली थंड नजर जेम्सवर ठेवली होती. दुसरा सर राल्फशी बोलण्यात गढल्याचे दाखवीत होता. तरी त्याचे लक्ष जेम्सकडेच होते.

फुले, हवा, सरकारी भवनाचा इतिहास, भवनाची दुरुस्ती यांच्याविषयीचे 'मॉंटी 'चे फालतू बोलणेसुद्धा ते तन्मयतेने ऐकत होते. त्यांनी आपल्याला नीट पाहून घेतले आहे, अशी जेव्हा जेम्सची खात्री झाली तेव्हा तो घाईने म्हणाला, "ठीक आहे. मी चलतो आता. हवा अशी छान राहिली तर बरं होईल. विमानानं अजून पुष्कळ ठिकाणी जायचंय मला." असे म्हणून जेम्स वळलासुद्धा.

सर राल्फनी त्या दोघांना आत नेले. या साऱ्या प्रकाराला फार थोडा काळ लागला होता. पण या अल्पावधीतच ते दोन गुप्तहेर आणि कदाचित हजारो दोस्त सैनिक यांचे भवितव्य पार बदलले होते.

जेम्सला नंतर समजल्याप्रमाणे ते दोघे स्पॅनिश उद्योगपती हिटलरचे अत्यंत विश्वासू व चतूर हस्तक होते. त्यांना हेरगिरीचे खास शिक्षण देण्यात आले होते. मॉंटीवर पाळत ठेवण्यासाठीच त्यांची नेमणूक जिब्रॉल्टरला झाली होती.

या उपरिनिर्दिष्ट भेटीपूर्वी काही काळ ब्रिटिश गुप्तहेरखात्याकडून मॉंटीच्या जिब्रॉल्टर–आगमनाची आणि पुढील मध्य–पूर्वेच्या दौऱ्याची मोठ्या चतुराईने जाहिरात करण्यात आली होती. ही वार्ता जर्मनीत पोहोचली आणि मॉंटीचे विमान पाडण्याचा हुकूम हस्तकांना मिळाला. परंतु अगदी शेवटच्या घटकेला हुकमात बदल केला गेला. जिब्रॉल्टरला येणारा दुसरा-तिसरा कोणी नसून खुद्द मॉंटीच आहे, याची खात्री करून घेण्याचा नवा हुकूम निघाला. त्या अन्वये हे दोन हेर जर्मनीला गेले. वरिष्ठांशी त्यांनी खलबते केली आणि नकली नावे व नकली कागदपत्रे घेऊन ते जिब्रॉल्टरला आले. जिब्रॉल्टरला येऊन ते साध्यासुध्या, सचोटीच्या व्यापाऱ्यांची भूमिका वठवू लागले. त्यांचे दोन दुय्यम हस्तक होते. एक होता विमानतळावर आणि दुसरा सरकारी भवनाच्या दुरुस्तीच्या कामावर !

मॉंटीच्याऐवजी कदाचित त्याच्या तोतयाची पाठवणी करून आपल्या डोळ्यांत धूळ फेकली जाईल, हे जर्मन अधिकारी जाणत होते. म्हणून त्याची शहानिशा करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी या उद्योगपती म्हणून वावरणाऱ्या दोघा हेरांवर टाकलेली होती. त्यांच्यापैकी प्रत्येकाने वेगळा अहवाल गुप्तहेरप्रमुख अॅडमिरल कॅनारिसकडे पाठवावयाचा होता. मॉंटीला मारायचे किंवा नाही याचा निर्णय कॅनारिस घेणार होता.

[ अपूर्ण ]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## मे महिन्याचे राशि-भविष्य

**मेष :** मंगळ तुमच्या राशीतून पसार झाला, सूर्याचेही १३ मेस तेथून उच्चाटण होणार आहे. तुमच्या मार्गातील हे दोन अडसर दूर झाले. आता तुम्हाला कोणाचीही डर नाही; निर्धास्तपणे–पण निर्धाराने पुढे चला. भविष्यकाल तुमचाच आहे. तुमच्यातील सुप्त सामर्थ्य आता उफाळून येईल. तुमचे कर्तृत्व दाही दिशा चौफेर उधळू लागेल. जगापुढे आदर्श राहील, असे काही महान कार्य आपल्या हातून घडेल.

यांत्रिक आणि तांत्रिक क्षेत्रांत तर तुमचा हात धरणारा कोणीच आढळणार नाही. १६ मेच्या सूर्य-हर्षल त्रिकोणापासून नव्या–आकर्षक कार्यक्षेत्राशी तुमचा घनिष्ठ संबंध येऊ लागेल.

दुसऱ्या पंधरवड्यात आपण कुठेही गेलात, काहीही केलेत, तरी ते अपेक्षेबाहेर यशस्वी ठरेल.

२ ते ४, १५ ते २०, २८ ते ३० या काली आपण मनात आणाल ते घडेल.

**वृषभ :** सध्याचे दिवस अपेक्षेप्रमाणे स्वास्थ्याचे नसल्याची जाणीव गेल्या आठवड्यापासूनच व्हायला लागलेली असल्यामुळे आपण काहीसे नाराज आहात. मंगळाच्या राश्यंतराचा हा सारा परिणाम.

या वेळी आपणासही आपली चाकोरी बदलावी लागेल. वारा वाहील तशी पाठ फिरवणे भाग आहे.

वाढता खर्च थोपविणे आटोक्याबाहेरचे आहे, असे वाटू लागेल. विरोधकांना ठोकरून काढणे फारसे सोपे नाही, याचीही प्रकर्षाने जाणीव व्हायला लागेल. काही काल नम्रता, लीनता यांचे पाठ घेण्याशिवाय गत्यंतरच नाही.

दुसरा पंधरवडा काहीसा प्रगतीचा दिसू लागेल. सूर्य-हर्षल त्रिकोणापासून नव्या आशा अंकुरायला लागतील. मरगळलेली मने टवटवीत दिसू लागतील. शेती, रासायनिक द्रव्ये, परराष्ट्रीय व्यापार या व्यवसायांतील व्यक्तींना मात्र हा महिना बराच प्रगतीचा दिसावा.

दि. ३ ते ६, १६ ते २३, २८ ते ३१ या कालाची विस्मृती होऊ देऊ नका.

**मिथुन :** सध्याच्या ग्रहस्थितीकडे पाहिल्यानंतर आपल्या बाबतीत मला असे म्हणावेसे वाटते की, 'हुकमी यश मिळवतील फक्त मिथुनराशी व्यक्तीच'. मंगळ

व्ययस्थानी आला तरी तुमची प्रगती रोखली जाणार नाही. पराक्रमस्थ गुरू आणि सूर्य-शुक्रांची सहानुभूती हा मणिकांचन योगच.

१६ मेच्या सूर्य-हर्षल त्रिकोणापासून नव्या आशा पल्लवतील. कर्तृत्वाला वाव देणारे नवे क्षेत्र हाती येईल. तुम्ही जिथे जाल तिथे यश तुम्हाला सामोरे येईल. या महिन्यात स्थानांतर घडेल आणि तो बदल भविष्यकालीन यशाची ग्वाही देऊ शकेल.

दुसऱ्या पंधरवडयात तुमचा ध्येयवाद आकार घेऊ लागेल, अपेक्षा अपेक्षेबाहेर सफल होतील.

दि. २ ते ४, १४ ते १९, २२ ते २६ या कालाची नोंद करा.

कर्क : मंगळाच्या पाठोपाठ रवि-शुक्र-बुध ही लाभस्थानी येणार आहेत. आजवरच्या तुमच्या नेत्रदीपक यशावर हे योग सुवर्णकलश चढवतील. आजवरच्या साऱ्या हुकलेल्या संधी मेच्या दुसऱ्या पंधरवडयात दारी उभ्या ठाकतील. त्यांची आत्मीयतेने दखल घ्या. तुम्हांला हवं ते मिळेल.

मे महिना तुमच्या जीवनात चिरंतन स्मृतीचा ठरेल. लाभ–प्रतिष्ठा–यश–स्वास्थ्य कधी मिळाले नसेल एवढे मिळेल.

साहित्यकला, ग्रंथप्रकाशन, वृत्तपत्रीय कार्य या बाबतींत तुम्हांला अत्युच्च स्थान लाभेल. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल, आजवर कधीही न सुटलेले प्रगतीचे गणित आता या महिन्यात कुणाचीही मदत न घेता झटपट सोडवून दाखवाल.

दि. ७ ते १२, १५ ते २१, २७ ते ३० या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

सिंह : अनेक समर्थ ग्रह भाग्यस्थानातून दशमस्थानाकडे सरकत आहेत. नेत्रदीपक यशाचा साक्षात्कार याच महिन्यात घडावा आणि माझे आवर्जून सांगणे आपल्या प्रत्ययास येईल की १६ मेच्या रवि-हर्षल त्रिकोणापासून.

अद्‌भुत, अनन्यसाधारण आणि अलौकिक असे काही भव्य–दिव्य आपल्या हातून घडवून आणावे. असाच या ग्रहस्थितीचा आंतरिक हेतू असावा.

या महिन्यापासूनच राजकीय क्षेत्रातील अत्युच्च स्थान आपणास लाभेल, अर्थशास्त्र, परराष्ट्रीय राजकारण, वैज्ञानिक संशोधन अशाच प्रकारच्या आणखी काही महान कार्याशी आपला घनिष्ठ संबंध यावा आणि या साऱ्या कार्यात आपण यशही मिळवाल.

दि. १ ते ४, ८ ते १२, १६ ते २१, २४ ते २७ हे कालखंड अविस्मरणीय ठरतील.

कन्या : मंगळाच्या राश्यंतराबरोबरच तुमच्या मनातील नैराश्य आणि कृतीतील मंदत्व ओसरायला सुरुवात झाली (२९ एप्रिलपासून) सूर्य-बुधही आपल्या भाग्यस्थानाकडे वाटचाल करू लागलेले आहेत. आता यापुढे माघार नाही की, घोळ घालीत बसणे नाही.

दुसऱ्या पंधरवड्यात तुमच्या उत्साहाला उधाण येईल, कर्तृत्वाला धार चढेल. उलटलेला डाव पुन्हा सावरला जाईल. एवढेच नव्हे तर विरोधकांवर मातही करून दाखवण्याइतके आपले सामर्थ्य वाढेल. शनि-गुरुबद्दल आता खंत बाळगण्याचे मुळीच कारण नाही.

दुसऱ्या पंधरवड्यात दूरचा प्रवास घडेल. इष्टमित्रांचे हरघडी साहाय्य लाभेल. सांपत्तिक स्थितीही अपेक्षेबाहेर सुधारेल.

दि. ३ ते ६, १२ ते १९, २६ ते ३० या काली आपले महत्त्व वाढीस लागेल.

**तूळ :** सूर्य-मंगळाची सहानुभूती या महिन्यात लाभेल, ही आशा खोटी. मंगळ सप्तमातून अष्टमात गेल्याने फारसा काही फरक पडेल, असे दिसत नाही. त्याच अडचणी, त्याच विवंचना, अनारोग्याची त्यात आणखीन भर. काही काल जपून पावले टाकल्याशिवाय गत्यंतर नाही. अकरावा गुरू एवढे एकच आशास्थान. ही अनिष्टता फार काळ सहन करावी लागणार नाही. एक दीड महिन्याचा काल ओलांडला की, सर्वत्र रम्य–आशादायक हिरवळ दिसू लागेल.

या महिन्यात व्यवसायधंद्याचे तंत्र थोडे बदलून पाहा. काहीसे मिळते जुळते घेण्याची प्रवृत्ती ठेवलीत तर हे अनिष्ट दिवस फारसे त्रासदायक ठरणार नाहीत.

दि. ६ ते ९, १२ ते १९, २४ ते २७ या काली बऱ्याच गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडाव्यात.

**वृश्चिक :** मंगळ आणि काही दिवसांनी सूर्य हे अत्यंत प्रखर ग्रह तुमच्या राशी-समोरच उभे ठाकणार आहेत तुमची प्रगती रोखण्याचा त्यांचा हेतू दिसतोय. अशा वेळी तुम्हीही सावधपणाने पावले टाकायला हवीत.

कौटुंबिक वातावरण चिघळेल, भागीदारीत संघर्ष वाढू लागेल, व्यावसायिक क्षेत्रात मतभेदाची वावटळे उठायला लागतील, नोकरीत वरिष्ठ ची नाराजी पत्क-रायला लागेल. मोठ्या त्रस्त अस्वस्थ वातावरणातून तुम्हांला जावे लागेल

१६ मेच्या सूर्य-हर्षल त्रिकोणाच्या आसपासचा काळ काहीसा आशादायक जाण-वेल. पण तेवढ्याने काही तुमच्या महत्त्वाकांक्षी मनाला समाधान वाटू शकणार नाही.

दि. ४ ते ६, १३ ते १९, २२ ते २५ या काली थोड्याफार अनुकूल गोष्टी घडायला लागतील.

**धनू :** भाग्यस्थ गुरूचे मांगल्य आता क्षणोक्षणी प्रत्ययास यायला लागेल आणि त्यामुळे चौथ्या शनि-राहूंच्या अनिष्टतेची दखल घ्यायची गरजच भासणार नाही.

दुसरा पंधरवडा तर आपल्या आजवरच्या बहुतेक साऱ्या असफल आकांक्षा सफल करणारा जाणवेल.

व्यावसायिक प्रगतीचा मार्ग निर्वैर आणि निर्वेध झाल्याची क्षणोक्षणी जाणीव व्हायला लागेल.

या महिन्यात दूरचा प्रवास घडेल, नवे कार्यक्षेत्र हाती येईल, अधिकाराच्या स्थानी वर्णी लागेल.

दि. ३ ते ५, १४ ते १८, २३ ते २८ या काली अनेक योजना आकार घेऊ लागतील.

**मकर :** चौथ्या मंगळाची व्यथा आता मिटल्यामुळे या महिन्यात गेल्या महिन्यातील सारे पेचप्रसंग भराभर सुटायला लागतील.

विशेषत: दुसऱ्या पंधरवड्यातील सूर्य-हर्षल त्रिकोणामुळे आपले कार्यक्षेत्र प्रगतीने उघाणास येईल. आपल्या जीवनातील चिरंतन स्मृतीच्या अनंत घटना याच वेळी घडून याव्यात.

यांत्रिक धंद्याचे आपले स्वप्न याच वेळी आकार घेऊ लागेल, न होणारी अनेक महत्त्वाची कामे या वेळी सहजासहजी घडून यावीत.

परराष्ट्रीय संबंध वाढू लागतील.

दि. ९ ते १९, २२ ते २७ हा कालखंड अपेक्षासाफल्याचा जाणवेल.

**कुंभ :** तुम्ही बुद्धिवान आहात—कर्तृत्वसंपन्न आहात—पण या साऱ्या तुमच्या गुणांची मुलाहिजा न ठेवता सध्याचा चौथा मंगळ तुम्हाला धारेवर धरायला कमी करणार नाही १३ मेस सूर्यही त्याच्या जोडीला येणार आहे. दुसऱ्या पंधरवड्यात हे तणातणीचे प्रसंग निर्माण व्हायला लागतील. पुढील प्रसंगाला तोंड द्यायची आतापासूनच तयारी केलीत, तरच आगामी कालातील संभाव्य पेचप्रसंग टाळू शकाल.

नोकरीधंद्यांत नव्या समस्या वाढू लागतील, सांपत्तिक अडचणी तीव्रतेने जाणवायला लागतील. तुमची बुद्धी, तुमचे कर्तृत्व या मंगळापुढे निष्प्रभ बनेल. अशा वेळी काहीसे मिळतेजुळते घेण्याशिवाय गत्यंतरच नाही.

दि. २ ते ५, १२ ते १९, २५ ते २८ या काली आपले हेतू काही प्रमाणांत सफल व्हावेत

**मीन :** कित्येक महिन्यांनंतर मंगळ तुमच्या पराक्रमस्थानी येत आहे. तो तुम्हाला साडेसातीची झळ बाधू देणार नाही की, व्यावहारिक अडीअडचणी निर्माण करू शकणार नाही.

तुमच्या आजवरच्या साऱ्या परिश्रमांचे श्रेय येथूनच तुमच्या पदरी पडायला लागेल. साडेसातीची सारी अनिष्टता आपण पचवून टाकलेली असल्यामुळे कोणत्याही गोष्टीबद्दल माघार घेण्याचा प्रसंगच आता उद्भवणार नाही.

कलासाहित्य, चित्रनिर्मिती ही तुमची खास क्षेत्रे. त्यामध्ये कधी नव्हते एवढे यश आता सहजासहजी मिळू शकेल.

दि ४ ते ७, १३ ते १८, २१ ते २५ या काली अपेक्षासाफल्याचा प्रत्यय यावा.

 पृष्ठ २१ वरून

आहे असे वाटत होते, पण आता टेलिव्हिजनला योग्य ते स्थान मिळाले आहे. यापुढे चित्रपट कसे निर्माण व्हावेत हे तरुण पिढीवर अवलंबून राहणार आहे, कारण ज्यांची बाहेर जायची तयारी आहे त्यांच्यासाठी चित्रपट आहेत. प्रौढ मंडळींना घरीच बसून मिळणारी करमणूक आवडते, म्हणून त्यांच्यासाठी टेलिव्हिजन आहे.

'स्टार सिस्टिम' ही सर्व जगातील चित्रपट–व्यवसायात प्रचलित आहे. उदाहरणार्थ, एलिझाबेथ टेलर ही जगातील एक सर्वोच्च कोटीची नटी समजली जाते. तिने वॉर्नर ब्रदर्सबरोबर केलेल्या करारानुसार तिला दहा लाख डॉलर्स आणि कंपनीच्या नफ्याचा दहा टक्के भाग मिळणार आहे. "हिला स्टार–सिस्टिम म्हणायचे नाही तर काय म्हणायचे?"

### ☐ सामाजिक कर्तव्याचा 'धर्म'

हिंदुस्थानाला आपली दुसरी मायभूमी समजणारे पूर्व-जर्मन इतिहासकार डॉ. हॉर्स्ट क्रूगर नुकतीच आणखी एक भारतभेट देऊन गेले तेव्हा त्यांनी पाश्चिमात्य दृष्टीतून भारत कसा दिसतो याची थोडीशी कल्पना दिली. त्यांच्या मते १९५६ च्या सुमारास भारत जागतिकदृष्टचा महत्त्वाचा देश म्हणून पुढे येऊ लागला होता आणि मधून मधून नेहमी चाललेल्या युद्धांनी पीडलेल्या युरोपियन जनतेला भारताच्या तटस्थतेचे आणि शांतता व सहकार्य स्थापित करण्याच्या प्रयत्नाचे आकर्षण वाटू लागले होते. भारतात एकीकडे समाजवाद व राष्ट्रवाद आणि दुसरीकडे पुराणमतवादी परंपरा यांचा परस्पर–विरोध अत्यंत उद्बोधक आहे काही वेळा तर आधुनिक विकास व अंध परंपरा यांचा भलताच संघर्ष चाललेला दिसतो. शेतीची परंपरागत पद्धत आणि भविष्य–रचना ही दोन जुनाटपणाची उदाहरणे म्हणून सांगता येतील. उलट पंचायत ही एक जुनी पण लोकशाहीला खरोखरच उपकारक अशी संस्था आहे, कारण तिच्यात समाजाचे सर्व स्तर सामावू शकतात.

आपल्या भोवतालच्या समाजाबद्दल आपले कर्तव्य पार पाडणे म्हणजेच 'धर्म' अशी धर्माची व्याख्या केली तर हिंदुस्थानाची फारच झपाट्याने प्रगती होईल. ○

**क्षमस्व....**

'रातराणी' या सदराचा मजकूर वेळेवर हाती न आल्याने या अंकात देता आला नाही दिलगीर आहोत.

—*संपादक*

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

## "सारे जग श्वास रोखून बसेल"

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

**मूल्य : पंचवीस रुपये फक्त**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**